


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक २१५ * नांदेड * गुरूवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# घाटकोपरमध्ये दरड कोसळून ७ जणांचा मृत्यू; आणखी काही जण ढिगाऱ्याखाली



**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईच्या घाटकोपरमधील अशोक नगर येथील गौसिया चाळ परिसरात डोंगराचा भाग कोसळल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर अद्याप युद्धपातळीवर बचाव कार्य सुरु असून यात आतापर्यंत ७ जणांचा मृत्यू झाला आहे. यात आणखी मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. पहाटे साडे तीन ते चारच्या सुमारास ही दुदैवी घटना घडली होती. यात दोन ते तीन घरांवर दरड कोसळली असून यामध्ये अनेक जण अडकल्याची प्राथमिक माहिती आहे. अशातच सहा ते सात तासांच्या अथक परिश्रमानंतर सात जणांचे मृतदेह हाती लागले असून, अजूनही काही जण या ढिगाऱ्याखाली अडकून असल्याची माहिती आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, अडकलेल्या नागरिकांच्या बचावासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. यासाठी पहाटेपासून बचावकार्य सुरु असताना यात अल्ट्रा सेन्सर मशीनने मलब्या खाली अडकलेल्यांना शोधले जात आहे. तर ड्रोनची देखील मदत यात घेण्यात आली आहे.

या भूस्खलनात डोंगराचा मोठा भाग दोन ते तीन घरांवर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि घाटकोपर पोलीस दाखल झाले होते. सध्या संबंधित विभागाकडून बचावकार्य सुरू आहे.

दरम्यान, साकीनाका येथील दुर्घटनेत मृतांचा कुटुंबातील लोकांना पालिकेकडून ३ लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तर दुर्घटना घडलेल्या ठिकाणी रहात असलेल्या लोकांचे सुरक्षितस्थळी पुर्नवसन केलं जाईल. अशी देखील माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे. तर या पूर्वीच तिथे राहणाऱ्या लोकांना तो परिसर धोकादायक असल्याने नोटीसा बजावल्या होत्या. असे देखील सांगण्यात आलं आहे. तर यावर बोलताना महापौर रितू तावडे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितलं की, 'साकीनाका येथील घटना अंत्यत दुर्दैवी आहे. या दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना आपण ३ लाखांची मदत जाहिर केलेली आहे. मात्र अंत्यत चिंचोळ्या गल्या आहेत. घटनास्थळी मशीन पोहचू शकत नसल्याने मनुष्यबळाचा वापर करूनच मदत करावी लागणार आहे. अजून काही लोकं अडकली असून मदतकार्य आणखी काही तास सुरू राहिल. या धोकादायक ठिकाणी घरांची नोटीसा देण्यात आल्या होत्या. मात्र लोकं त्यांचं पालन करत नाहीत. असे त्या म्हणाल्या.

## नीट विद्यार्थी आंदोलनावर संसदेत चर्चेचे गृहमंत्री अमित शाह यांचे आव्हान

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जंतरमंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनावर आणि नीट पेपर फुटीप्रकरणावरून संसदेत आक्रमक झालेल्या विरोधकांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी थेट प्रत्युत्तर दिले आहे. मोदी सरकार संसदेत कोणत्याही प्रकारच्या चर्चेसाठी पूर्णपणे तयार असून, आपण विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यास सज्ज असल्याचे शाह यांनी स्पष्ट केले आहे. पहिल्यांदाच प्रसारमाध्यमांसमोर या विषयावर थेट भाष्य करताना त्यांनी विरोधकांना चर्चेचा एक स्पष्ट प्रस्ताव दिला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांना आवाहन केले आहे की, त्यांनी आज दुपारी २ वाजेपर्यंत लोकसभेच्या अध्यक्षांना चर्चेची विनंती करणारे पत्र सादर करावे. त्यानुसार आज दुपारी ३ वाजल्यापासून या विषयावरील चर्चेला सुरुवात करावी, जी रात्री उशिरापर्यंत आणि उद्या दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू ठेवता येईल. लोकसभा अध्यक्षांनी परवानगी दिल्यास, सरकार प्रश्नोत्तराचा तास पुढे ढकलण्यासही तयार असल्याचे त्यांनी सांगितले. मी स्वतः सभागृहात बसेन, सर्वांचे म्हणणे ऐकून घेईन आणि उद्या दुपारी ३ वाजता विरोधी पक्षाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देईन. सरकारकडे लपवण्यासारखे काहीही नाही. या सविस्तर चर्चेमुळे देशासमक्ष संपूर्ण सत्य समोर येईल, असे शाह यांनी ठणकावून सांगितले.

# शिवसेना पक्षप्रकरणी कपिल सिब्बल यांची निवडणूक आयोगावर टीकेची झोड




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतची अंतिम सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाकरेंच्या शिवसेनेचे वकील कपिल सिब्बल हे न्यायालयात बाजू मांडत आहेत. त्यामध्ये, निवडणूक आयोगाकडून चुकीच्या पद्धतीने शिवसेना पक्ष आणि चिन्ह एकनाथ शिंदेंना देण्यात आल्याचं त्यांनी म्हटलं. त्यानंतर, आजही त्यांच्याकडून सरन्यायाधीशांसह खंडपीठासमोर युक्तिवाद केला जात आहे. त्यामध्ये, सिब्बल यांनी बुधवारी निवडणूक आयोगाचं पितळ उघड पाडल्याचं दिसून आलं, कृपया ४ एप्रिल ही तारीख आणि आयोगाचा शिक्का पाहा, ही २०१८ मधील बाब आहे, असे म्हणत सिब्बल यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत.

वरिष्ठ वकील कपिल सिब्बल म्हणाले की, काल मी 'लोकप्रतिनिधी कायदा' मधील कलम २९-ए (एस२९ए) दाखवत होतो. कृपया पोट-कलम (४) च्या संदर्भात पोट-कलम (९) पहा. जर नाव, मुख्यालय, पदाधिकारी किंवा पत्ता यामध्ये काही बदल झाला असेल, तर त्याची माहिती देणे आवश्यक असते. आता आम्ही निवडणूक आयोगाला काय कळवले होते ते पहा. त्यावरून अनावश्यक वाद निर्माण केला जात आहे. माझे कर्तव्य काय होते? मी निवडणूक आयोगाला पत्र लिहून पदाधिकाऱ्यांची नावे कळवली होती. बदल झाला आहे हे त्यांना माहित आहे, म्हणूनच ते आम्हाला माहिती देण्यास सांगतात. ते म्हणतात की, त्यांना २०१८ च्या घटनेबद्दल (पक्ष-संविधानाबद्दल) माहिती नाही. परंतु आमच्या पत्रव्यवहारात 'शिवसेना पक्षप्रमुख' असा उल्लेख होता, असे त्यांनी न्यायालयासमोर मांडले.

# पेपरफूट गैरप्रकारबाबत केंद्राचा कायदा राज्यात लागू

## परीक्षा पद्धती सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती; मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** पेपरफूट गैरप्रकाराबाबत केंद्राचा कायदा राज्यात लागू करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात विविध सेवाभरतींसाठी होणाऱ्या परीक्षा पद्धतीत सर्वसमावेशक, अधिक सुरक्षित आणि सर्वसमतीने सुधारणांसाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी घेतला. या समितीने राज्यात प्रत्येक विभागात जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत सर्वंकष सुधारणांबाबत अहवाल सादर करायचा आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा उपस्थित होते, त्यांनीही अनेक उपयुक्त सूचना या बैठकीत केल्या. राज्यात गेल्या काही वर्षात सातत्याने होत असलेल्या पेपरफुटी, आणि महत्वाच्या परीक्षांमधील घोळांच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.

वर्षा निवासस्थानी बुधवारी विशेषत्वाने आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे निर्देश दिले. ही उच्चस्तरीय समिती सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेत राहणार असून राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी आणि नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा त्यात समावेश असेल.

अलिकडेच केंद्र सरकारने पेपरफूट आणि परीक्षा गैरव्यवहारासंदर्भात संसदेत एक कायदा केला आहे. महाराष्ट्राचाही स्वतंत्र कायदा आहेच. तथापि संसदेने केलेला कायदा अधिक कठोर असल्याने तो महाराष्ट्रातही लागू करण्यासंदर्भात येणाऱ्या पंधरवड्यात प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले.

# महाराष्ट्रात मराठी येत नसल्यास आता चालकाचे लायसन्स रद्द होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईसह महाराष्ट्रात आता रिक्षा आणि टॅक्सी चालकाला मराठी येत नसल्यास त्याचे लायसन्स रद्द करण्यात येणार आहे. या संदर्भात शासन निर्णय जाहीर होणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

सदर नवीन नियमाप्रमाणे जर रिक्षा किंवा टॅक्सी चालकाला मराठी भाषेचे व्यवहारिक ज्ञान नसेल, जुजबी मराठी देखील बोलता येत नसेल तर त्याला आधीच एका महिन्याची नोटीस देण्यात येईल. त्या एका महिन्यात देखील चालकाने मराठी शिकली नाही, तर त्याचे लायसन्स ३ महिन्याच्या कालावधीसाठी रद्द करण्यात येणार आहे. यानंतर देखील चालक मराठी शिकत नसेल तर त्याचे लायसन्स कायमस्वरूपी रद्द करण्याची तरदूत या कायद्यामध्ये असणार आहे. आजच हा नवीन कायदा लागू केला जाणार आहे. परिवहन विभागातर्फे शासनाच्या विधी आणि न्याय विभागाला कायद्यात बदल करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, तो मंजूर झाल्याने आज शासन निर्णय जाहीर होणार आहे. त्यामुळे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मराठीच्या मोहिमेला आता कायद्याचे संरक्षण असणार आहे.

# जीर्ण इमारती, टपकणारे पाणी, अस्वच्छता आणि शाळांचे प्रश्न!

## मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष; गुरुजी AI कसे शिकू?

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिका शाळांच्या जीर्ण इमारतींची दुरुस्ती, विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे, पिण्याच्या शुद्ध पाण्याची सुविधा, शाळांमध्ये पुरेशी बसण्याची व्यवस्था, शाळेचे कठडे आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी संबंधित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रश्नांवर सर्वसाधारण सभेत ठोस निर्णय घेणे आणि त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, शिक्षण विभागाला पुरेसा निधी का दिला जात नाही, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. यामुळे शाळेतील विद्यार्थी गुरूजींना एआय (AI) कसे शिकू, असा प्रश्न करत आहेत.

महानगरपालिकेच्या ११ ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत महापालिका शाळांमधील गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले. हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी जोडलेल्या शैक्षणिक आणि मूलभूत सुविधांवर सखोल चर्चा होणे अपेक्षित असताना या विषयाला अपेक्षित महत्त्व मिळाले नाही. त्यामुळे शिक्षणासारख्या महत्त्वाच्या मूलभूत प्रश्नाकडे महापालिकेचे महापौर आणि आयुक्त कानाडोळा का करीत आहेत, असा सवाल नागरिक आणि पालकांकडून उपस्थित होत आहे.

महापालिका शाळांमध्ये प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि गोरगरीब कुटुंबांतील मुले शिक्षण घेतात. त्यामुळे या शाळांमधील सुविधांचा प्रश्न हा केवळ शाळांचा प्रश्न नसून सामाजिक न्याय आणि समान शैक्षणिक संधीचा प्रश्न आहे. गोरगरिबांची मुले महापालिका प्रशासनासाठी महत्त्वाची नाहीत का? त्यांच्या शिक्षणासाठी सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार वातावरण उपलब्ध करून देणे प्रशासनाची जबाबदारी नाही का, असे प्रश्न पालकांकडून उपस्थित केले जात आहेत.

दरम्यान, सर्वसाधारण सभेत शिक्षणाच्या प्रश्नांवर नगरसेवकांना पुरेसा वेळ आणि संधी का देण्यात आली नाही, याबाबतही नाराजी व्यक्त होत आहे. लोकप्रतिनिधींना त्यांच्या प्रभागातील शाळांच्या समस्या सभागृहात मांडण्याची संधी मिळणे हा लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे. महिला नगरसेविकांसह काही नगरसेवकांनी विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना पुरेसा वेळ न मिळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

महापालिका प्रशासन किंवा शिक्षणाधिकारी महापालिकेच्या शाळांकडे का दुर्लक्ष करीत आहेत, हा प्रश्न आता अधिक गंभीर झाला आहे. शाळांच्या दुरुस्तीसाठी आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला? किती शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या? विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था किती शाळांमध्ये आहे? याची स्पष्ट माहिती प्रशासनाने जनतेसमोर ठेवण्याची गरज आहे.

महासभेत शिक्षणासारख्या मूलभूत विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठोस निर्णय घेण्यासाठी स्वतंत्र वेळ देणे आवश्यक आहे. केवळ प्रश्न उपस्थित करून किंवा आश्वासने देऊन हा विषय संपविण्याऐवजी महापालिका शाळांच्या दुरवस्थेवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. कारण या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य हेच नांदेडच्या भविष्यातील नागरिकत्व घडविणार आहे. त्यामुळे महापौर कविता मुळे आणि आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी शिक्षणाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून पुरेसा निधी उपलब्ध करून देत महापालिका शाळांचा कायापालट करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा पालक आणि नागरिक व्यक्त करीत आहेत.

# मनपाच्या 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत उत्साहात निघाली तिरंगा रॅली

## घरोघरी तिरंगा फडकवून राष्ट्रीय उत्सव साजरा करण्याचे मनपा प्रशासनाचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय स्वातंत्र्याच्या गौरवशाली इतिहासानिमित्त आणि केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्यावतीने मंगळवारी 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत शालेय विद्यार्थ्यांची तिरंगा रॅली अत्यंत उत्साही व देशभक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या रॅलीच्या माध्यमातून संपूर्ण नांदेड शहरात निर्माण झालेला देशप्रेमाचा ज्वर आणि नागरिकांचा प्रतिसाद अद्वितीय होता.


बुधवारी सकाळी ठीक ८ वाजता शहरातील तिरंगा ध्वज परिसर, शासकीय तंत्रनिकेतन चौक येथून या भव्य रॅलीला महापौर कविता संतोष मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी हिरवी झेंडी दाखवून अधिकृत सुरुवात केली.




या प्रसंगी स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, शिक्षण महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना लांडगे, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, माजी सभापती किशोर स्वामी, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, उपायुक्त गंगाधर ईरलोड, शिक्षणाधिकारी प्रविणा मांदळे, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. मिर्झा बेग, क्रीडा अधिकारी रमेश चवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रॅलीच्या अग्रभागी महापौर, पदाधिकारी, आयुक्तांसह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक आणि एनसीसी व स्काऊट-गाईडचे पथक शिस्तबद्ध पद्धतीने सहभागी झाले होते. ही रॅली शहरातील मुख्य चौक, बाजारपेठ आणि निवासी भागातून मार्गस्थ झाली असता संपूर्ण मार्ग तिरंगामय झाला होता.

या भव्य रॅलीमध्ये नांदेड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील तसेच शहरातील इतर नामांकित खाजगी शाळा, महाविद्यालयांमधील हजारो विद्यार्थी व विद्यार्थिनी गणवेशात हात तिरंगा ध्वज घेऊन सहभागी झाले होते.




# नांदेडमध्ये माजी सभापतींसह अनेक सरपंच, पदाधिकारी-कार्यकर्ते शिवसेनेत!

## आ. बालाजी कल्याणकर यांच्या पुढाकार; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात शिवसेनेच्या संघटनविस्ताराला आणखी बळ मिळाले असून, आ. बालाजीव कल्याणकर यांच्या पुढाकारातून नांदेड जिल्ह्यातील विविध पक्षांतील माजी सभापती, लोकप्रतिनिधी, सरपंच, पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. मुंबईतील नंदनवन बंगल्यावर उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

नाळेश्वर, राहटी आणि पिंपळगाव (कोरका) यांसह नांदेड जिल्ह्यातील विविध भागांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्वांचे स्वागत करून त्यांच्या पाठीशी शिवसेना आणि आपण स्वतः ठामपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

नाळेश्वर येथील माजी जिल्हा परिषद सभापती नरहरी ठाकराम वाघ, माजी सरपंच रुपेश केशवराव वाघ, ग्रामपंचायत सदस्य बालाजी व्यंकटी इंगोले, ग्रामपंचायत सदस्य बालाजी दत्ता भारती आणि शालेय व्यवस्थापन समितीचे बळीराम उत्तम वाघ यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

तसेच राहटी येथील भोजराज वामनराव बोकारे, रावसाहेब नागोराव बोकारे, गोविंद पुंडलिक बोकारे, भागवत एकनाथ बोकारे, लक्ष्मण भानुदास बोकारे आणि रतन संभाजी बोकारे यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

पिंपळगाव (कोरका) येथील नागेश व्यंकटराव बडवणे, जि.प. सदस्य बाळगीर खुशालगिरी गिरी महाराज, दत्तरामजी गणेशराव बडवणे, बालाजीराव माधवराव डुकरे, रावसाहेब दत्तरामजी सूर्यवंशी आणि गोविंदराव रावण जाधव यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते शिवसेनेत दाखल झाले. या पक्षप्रवेशासाठी संपर्कप्रमुख रमाकांत मढवी यांच्यासह स्थानिक पदाधिकाऱ्यांनी समन्वय साधला.




पक्षप्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे स्वागत करताना एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही सर्व कार्यकर्ते आलात. तुमच्या पाठीशी बालाजी कल्याणकर स्वतः आहेतच; पण बालाजी कल्याणकर यांच्या पाठीशी हा एकनाथ शिंदे आहे. सगळ्यांच्या पाठीशी मी स्वतः आहे, शिवसेना आहे.

आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून, जनतेला न्याय देण्याबरोबरच लोकांचे प्रश्न सोडविण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळेच मतदारसंघातील जनतेने त्यांना पुन्हा निवडून दिले असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला आशीर्वाद दिला असून, बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना आणि आनंद दिघे यांच्या शिकवणीला आदर्श मानून शिवसेनेची वाटचाल सुरू असल्याचेही शिंदे यांनी सांगितले.

## पायलटने चक्क गांजा पिऊन विमान उडविले

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्लीहून फुकेटला जाणाऱ्या विमानाच्या पायलटने गांजा घेऊन विमान उडवत असल्याचं तपासात उघड झालं आहे. या प्रकरणातील दोन्ही डोप टेस्ट पॉझिटिव्ह आली असून सध्या अधिक चौकशी सुरु असल्याची माहिती आहे. ४ ऑगस्ट रोजी फुकेतहून दिल्लीला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एआय २३७९ विमानातील हवेच्या झोतामुळे झालेल्या घटनेच्या तपासात आता हा महत्त्वपूर्ण खुलासा समोर आला आहे. दरम्यान, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुरवातीला मुख्य वैमानिकाची प्राथमिक तपासणी चाचणी (स्क्रीनिंग टेस्ट) नकारात्मक (नेगेटिव्ह) नव्हती. याचा अर्थ, चाचणीत काहीतरी संकेत आढळले, ज्यामुळे पुढील चाचणी करणे आवश्यक होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# लोकशाही जगायची असते!

लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक, मतदान आणि सत्तांतर नव्हे. लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. मतभेदांचा आदर, निर्णयप्रक्रियेत सहभाग, जबाबदारीची जाणीव, पारदर्शकता आणि सार्वजनिक हितासाठी नेतृत्व करण्याची तयारी या सगळ्यांचा संगम म्हणजे लोकशाही. म्हणूनच लोकशाहीचे धडे केवळ नागरिकशास्त्राच्या पुस्तकात शिकवून उपयोग नाही. ते प्रत्यक्ष अनुभवातूनच मनावर कोरले जातात. राजस्थानमधील अलवर जिल्ह्यातील बुरजा येथील एका छोट्याशा सरकारी माध्यमिक शाळेने याच सत्याची प्रभावी प्रचिती दिली आहे. शहीद श्री रामसिंग गुर्जर शासकीय माध्यमिक विद्यालयात चक्क निवडणूक घेण्यात आली आणि तीही भारताच्या निवडणूक प्रक्रियेचे अनुकरण करणारी! उमेदवारी अर्ज, छाननी, प्रचार, मतदान, गोपनीय मतदान, मतमोजणी आणि निकाल जाहीर करण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली. त्यामुळे नागरिकशास्त्रातील 'लोकशाही' हा शब्द पुस्तकाच्या पानावरून थेट शाळेच्या मैदानात उतरला. या उपक्रमात विद्यार्थीच उमेदवार होते, विद्यार्थीच प्रचारक होते आणि विद्यार्थीच मतदान अधिकारीही होते. काही विद्यार्थ्यांनी मतदारांची भूमिका बजावली, तर काहींनी निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारली. म्हणजेच लोकशाहीचे प्रत्येक चाक कसे फिरते, याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर छाननी झाली. प्रचार सुरू झाला. विद्यार्थ्यांनी आपली भूमिका मांडली, घोषणा दिल्या, सहकाऱ्यांशी संवाद साधला आणि आपल्या भविष्यातील कामाचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे या प्रक्रियेत राजकीय संघर्षाऐवजी निरोगी स्पर्धेला प्रोत्साहन देण्यात आले. आजच्या राजकारणात ज्याचा अनेकदा अभाव जाणवतो, तो संयम, सभ्यता आणि विचारांचा संवाद या विद्यार्थ्यांनी आपल्या पद्धतीने दाखवून दिला. मतदानाच्या दिवशी शाळेचे रूपांतर छोट्याशा मतदान केंद्रात झाले. मतदान केंद्र, मतपत्रिका, गोपनीय मतदान आणि मतदानाची शिस्त याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रत्येक मताचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. त्यानंतर पारदर्शक पद्धतीने मतमोजणी झाली आणि सर्वांच्या उपस्थितीत निकाल जाहीर करण्यात आला. या निकालाचा खरा अर्थ पदांची नावे किंवा विजयी विद्यार्थ्यांची संख्या यात नाही. महत्त्वाचे हे की, नेतृत्व हे अधिकाराने मिळत नाही; ते विश्वासातून मिळते, हा धडा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवला. मात्र या प्रयोगाचे महत्त्व निवडणूक संपल्यानंतर अधिक अधोरेखित होते. नव्याने स्थापन झालेल्या बाल संसदेला शाळेची स्वच्छता, पाणी बचत, प्लास्टिकमुक्त परिसर, पर्यावरण संरक्षण, आरोग्य, शिस्त आणि शाळेच्या विकासासारख्या विषयांमध्ये काम करण्याची जबाबदारी देण्यात आली. म्हणजेच निवडणूक ही केवळ खेळ नव्हता; ती जबाबदारी स्वीकारण्याची सुरुवात होती. आजच्या काळात हा प्रयोग विशेष महत्त्वाचा ठरतो. समाजमाध्यमांवरील अपप्रचार, पैशाचा आणि जातीय-धार्मिक समीकरणांचा वाढता प्रभाव, राजकीय ध्रुवीकरण आणि मतदानाविषयी उदासीनता या पार्श्वभूमीवर भावी मतदारांना लोकशाहीची खरी ओळख करून देणे अत्यावश्यक आहे. मत देणे म्हणजे केवळ बोटावर शाई लावून घेणे आणि मिरविणे नव्हे; योग्य प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी स्वीकारणे आहे. आपल्या शाळांमध्ये परीक्षेतील गुणांना जितके महत्त्व दिले जाते, तितकेच जबाबदार नागरिक घडविण्याला दिले गेले पाहिजे. संविधान, मतदानाचा अधिकार, मूलभूत कर्तव्ये, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक जबाबदारी यांचे धडे पुस्तकातून देण्याबरोबरच त्यांचा अनुभवही विद्यार्थ्यांना मिळायला हवा. शाळांमध्ये बाल संसद, विद्यार्थी निवडणुका, अभिरूप संसद आणि स्थानिक प्रश्नांवर विद्यार्थी चर्चा यांसारखे उपक्रम नियमितपणे झाले तर लोकशाहीची पायाभरणी अधिक भक्कम होईल. बुरजा येथील या छोट्याशा शाळेने मोठा संदेश दिला आहे की, लोकशाही शिकवून तयार होत नाही; तर लोकशाही जगून तयार होते. आजचा विद्यार्थी उद्याचा मतदार, नागरिक, प्रशासक, लोकप्रतिनिधी किंवा नेता असणार आहे. त्याच्या हातात मतदानाची ताकद देण्यापूर्वी त्याला त्या ताकदीची किंमत समजावून सांगणे ही शिक्षणव्यवस्थेची जबाबदारी आहे. अशा प्रकारचा प्रयोग प्रत्येक शाळेमध्ये वर्षातून एक वेळा केला गेला पाहिजे, कारण लोकशाहीचे भविष्य संसद भवनातच ठरत नाही; ते शाळेच्या वर्गखोल्यांमध्ये, मैदानावर आणि विद्यार्थ्यांच्या मनात घडत असते. त्यामुळे प्रत्येक शाळेत अशी छोटी लोकशाही फुलली, तर उद्याची भारतीय लोकशाही अधिक प्रगल्भ, जबाबदार आणि सशक्त होण्यास नक्कीच मदत होईल.

# शिवमूर्तींचा महिमा : श्रद्धा, शांती आणि शाश्वतता



भारतीय संस्कृतीतील देवतांमध्ये सर्वात प्राचीन, अनाकलनीय आणि अद्वितीय असा जो देव आहे, तो म्हणजे भगवान शंकर, महादेव, शिवशंभू. त्यांचं रूप एका क्षणी विश्वाला नाशाकडे घेऊन जाणारं रुद्रतत्त्व, तर दुसऱ्या क्षणी शांत, ध्यानस्थ, करुणामय अशा योगेश्वराचं प्रतीक. अशा या भोळ्याभाळ्या शंकराचे विविध ठिकाणी उभे असलेले दिव्य आणि भव्य विग्रह केवळ स्थापत्यशास्त्राचे नमुने नसून, त्या प्रत्येक प्रतिमेमध्ये भक्ताच्या मनाचा विश्वास, श्रद्धा आणि आत्मिक उन्नती यांचे प्रतिबिंब दिसून येते.

श्रावण महिना म्हणजेच भक्तीचा, उपासनेचा आणि शिवमहिमेच्या गुणगानाचा काळ. या काळात देशभरातील असंख्य शिवभक्त विविध शिवतीर्थांची यात्रा करतात. अशाच काही शिवप्रतिमांचे दर्शन घडवणाऱ्या प्रमुख स्थळांविषयी आपण आता जाणून घेणार आहोत जिथे श्रद्धा आकार धारण करते, आणि मूर्तींमधून भक्तांच्या मनाला आत्मशांतीचा अनुभव मिळतो.

**मुरुदेश्वर महादेव, कर्नाटक सागरकिनाऱ्यावरील शिवतत्त्व**

कर्नाटकमधील भटकल तालुक्यात, निळ्याशार अरब सागराच्या किनाऱ्यावर, तीन बाजूंनी समुद्राने वेढलेले एक मनोहारी ठिकाण मुरुदेश्वर महादेव मंदिर. 'मुरुदेश्वर' हे नावच भगवान शिवाचे दुसरे रूप आहे. येथील १२३ फुट उंच भव्य शिवमूर्ती नुसती पाहिली तरी अंगावर शहारे येतात. आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या या मूर्तीची निर्मिती तब्बल २ वर्षांमध्ये पूर्ण झाली. ही प्रतिमा देशातच नव्हे, तर संपूर्ण जगात दुसऱ्या क्रमांकाची सर्वात उंच शिवमूर्ती मानली जाते.

अरब सागराच्या लाटांनी स्पर्शलेली ही मूर्ती पाहताना क्षणभर वेळ थांबतो, आणि वाटते की स्वर्ग खाली उतरला आहे. इथे वर्षभर भाविकांची आणि पर्यटकांची मांदियाळी असते. मुरुदेश्वर हे केवळ तीर्थक्षेत्र नव्हे, तर भक्ती आणि निसर्ग सौंदर्याचा अद्वितीय संगम आहे.

**सर्वेश्वर महादेव, वडोदरा सरोवरातील दिव्यता**

गुजरातमधील वडोदरा शहराच्या मध्यभागी स्थित असलेले सूरसागर तलाव, आणि त्याच्या मध्यवर्ती भागात उभी असलेली १२० फुट उंच सर्वेश्वर महादेव यांची अष्टधातूची दिव्य प्रतिमा. या मूर्तीला आधार देणारे २३ खांब सरोवराच्या खोलगट तळाशी खोलवर रोवलेले आहेत. या भव्य मूर्तीचे निर्माण कार्य ६ वर्षे अखंड चालले. या ठिकाणी केवळ शिवभक्तच नव्हे, तर विविध धर्मीय पर्यटकही भक्तिभावाने नतमस्तक होतात. अहमदाबादपासून फक्त ११२ किलोमीटर अंतरावर हे स्थळ आहे. या मूर्तीभोवतीची निळसर तलावाची पार्श्वभूमी आणि शहराच्या कौलारू आकाशाखाली उभा असलेला हा दिव्य रूपवट एक अलौकिक आध्यात्मिक अनुभव घडवतो.

**आदियोगी शिव, कोयंबटूर योगाचे प्रतीक**

तामिळनाडूमधील कोयंबटूरपासून सुमारे ३० किमी अंतरावर असलेली आदियोगी शिवाची प्रतिमा, ही केवळ एक मूर्ती नसून योगतत्त्वाची साक्षात मूर्तिमंत अभिव्यक्ती आहे. जगातील सर्वात मोठ्या मुखप्रतिमांपैकी एक असलेली ही मूर्ती ११२ फुट उंच आणि ५०० टन वजनाची आहे. विशेष म्हणजे, ही मूर्ती धातूच्या तुकड्यांपासून बनवलेली असून, यात सिमेंट किंवा वाळूचा कोणताही वापर नाही. ही रचना ईशा फाउंडेशनच्या प्रयत्नांमुळे साकारली गेली आणि आज ती योग, साधना आणि मुक्तीच्या वाटेवर प्रेरणा देणारी आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये तिची अधिकृत नोंद झालेली आहे. ही मूर्ती पाहताना मनात विचार येतो शिव म्हणजे योग, आणि योग म्हणजे शिव.

**सिद्धेश्वर महादेव, सिक्कीम पूर्वेकडील वैभव**

सिक्कीममधील सोलोफोक टेकडीवर उभारलेली सिद्धेश्वर महादेवाची ८७ फुट उंचीची बैठकीतील मूर्ती, तिच्या पांढऱ्या शुभ्र रंगामुळे दूरवरूनच श्रद्धेचे आकर्षण ठरते. आधारसहित तिची एकूण उंची १०८ फुट आहे. स्थानिक लोक यांना 'नामची महादेव' आणि 'किरतेश्वर' या नावांनी पूजतात. या प्रांगणात शिवाच्या १२ ज्योतिर्लिंगांची प्रतिकृती तसेच चार धाम बद्रीनाथ, द्वारका, जगन्नाथ, रामेश्वरम यांची देखील कलात्मक स्थापनेत मांडणी केलेली आहे. यामुळे येथे आलेले भाविक एकाच ठिकाणी अनेक तीर्थस्थळांचा अनुभव घेऊ शकतात. पूर्व भारतात शिवभक्तीसाठी हे ठिकाण म्हणजे आस्था आणि स्थापत्य सौंदर्याचे अपूर्व उदाहरण.

**हर की पैड़ीचे शिव, हरिद्वार गंगा आणि शंकराचा संगम**

हरिद्वारमधील हर की पैड़ी हे गंगेच्या किनाऱ्यावरचे सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. येथे समोरच असलेल्या स्वामी विवेकानंद उद्यानामध्ये उभी असलेली १०० फुट उंच शिवमूर्ती पर्यटकांना दूरवरूनच खुणावते. या ठिकाणी संध्याकाळी केले जाणारे गंगेचे आरती दर्शन आणि त्याचवेळी शिवाचे सान्निध्य यामुळे भक्तीचा अनुभव दुप्पट होतो. गंगेच्या लाटांमध्ये दिव्यांची प्रतिबिंबे, घंटानाद, मंत्रोच्चार आणि आकाशाकडे पाहणाऱ्या शिवमूर्तीचा आत्मविसर्जन करणारा अनुभव हे सर्वच मनावर गारूड करतं.

**इतर भव्य शिवप्रतिमा शिवाचे विविध दर्शन**

शिव केवळ एकाच रूपात मर्यादित नाहीत. भारतभर विखुरलेल्या त्यांच्या अनेक भव्य मूर्ती हे सांगतात की श्रद्धेची सीमा नाही आणि भक्तीचं रूप सर्वव्यापी आहे.

जबलपूर (मध्य प्रदेश) येथे ७६ फुट उंच शिवमूर्ती असून तिच्या सभोवती १२ ज्योतिर्लिंगांची स्थापना करण्यात आली आहे.

बेंगळुरू (कर्नाटक) शिवोहम मंदिरातील ६५.६ फुट उंचीची शिवप्रतिमा, ज्यामागे हिमालयाची प्रतिकृती आहे.

द्वारका (गुजरात) नागेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरामध्ये ८२ फुट उंच शिवमूर्ती आहे.

**शिवमूर्ती : स्थापत्य की साधना?**

या सर्व प्रतिमा केवळ उंच अशा शिल्पकृती नाहीत. त्या भक्ताच्या मनातील विचारांना दिशा देतात, साधनेला प्रेरणा देतात आणि अस्तित्वाच्या अर्थाकडे घेऊन जातात. प्रत्येक मूर्तीच्या पाठीमागे असते भक्तांच्या भावनांचं आर्त स्वरूप, शिल्पकारांच्या हातातील करामत आणि काळाबरोबर उभं राहिलेलं श्रद्धेचं सामर्थ्य. शिवाचे रूप म्हणजे शून्य आणि अनंताचा संगम आणि भारतभर विखुरलेल्या या भव्य मूर्ती त्याच शून्य-अनंताला दृष्टिगोचर करतात.


श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर अशा दिव्य मूर्तींचे स्मरण केवळ एक धार्मिक कृती नाही, तर ती आपल्या सांस्कृतिक जडणघडणीतली मूळं शोधण्याची एक संधी आहे. या शिवमूर्ती म्हणजे वेळेच्या प्रवाहात अखंड उभ्या असलेल्या श्रद्धेच्या दीपस्तंभांसारख्या आहेत, जे आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जातात, आणि अंतःकरणात शांततेची ज्योत चेतवतात. शिवशंभो! हर हर महादेव!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनेचे प्रभावी चित्रण: कर्जबळी

साहित्य प्रकार कोणताही असो त्यात उत्कट जीवन दर्शनाची नितांत गरज असते मराठी साहित्याच्या प्रांतात नाट्य प्रकारात अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर कृ.प्र.खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, मामासाहेब वरेरकर,वीर वामनराव जोशी, ना. रा. बामणगावकर, प्र. के. अत्रे, अनंत काणेकर या सिद्धहस्त नाटककारांनी मराठी रंगभूमी सजविली आहे असे आपण वाचत आलो आहोत...अलीकडे बदलत्या काळानुसार असंख्य नाटककारांनी नाट्य लेखन करुन मराठी साहित्याचे दालन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु पूर्व सुरीच्या मराठी साहित्यिकांनी आपल्या लेखनातून कथा, कादंबरी, नाटक, काव्य इत्यादी दालनं समृद्ध केली होती त्यांना जो दर्जा प्राप्त झाला होता तो अलिकडे पार ढासळला आहे अशी ओरड होताना दिसते. त्यात काही अंशी तथ्य असेलही ते नाकारता येत नाही परंतु समीक्षकांच्या थिट्या असलेल्या मोजपट्या, अपुरे वाचन आणि आपपरभाव यामुळे सकस लेखनाकडे दुर्लक्ष झाल्याची असंख्य उदाहरणे पहायला मिळतात.. हे देखील तितकेच वास्तव आहे आज नाट्य लेखन आणि रंगभूमीवरील असंख्य प्रयोग नव्या रुपात प्रचंड ताकदीने पुढे येत आहेत .त्यात सामाजिक जीवनाचे वास्तववादी प्रत्ययकारी चित्रण येत आहे.त्याची निर्लेप समीक्षा होणे गरजेचे आहे.

गेल्या पंधरा सोळा वर्षांपूर्वी श्री वि.न.भोळे लिखित बळी गेला रे ही संहिता वाचनात आली होती..त्या वेळी त्या नाटकाचे प्रयोग झाले पुरस्कार ही मिळाले परंतु समीक्षकांच्या नजरेतून मात्र त्याला न्याय मिळाला नाही ही खंत आहे.नाट्य लेखक सामान्य शेतकरी कुटुंबातील आहे शेतकऱ्यांची होत असलेली फरफट हा त्याच्या चिंतनाचा विषय आहे. त्याकाळात शेतकरी आत्महत्या हा विषय गंभीर रूप धारण करीत होता. वि. न. भोळे हे एक चिंतनशील लेखक आहेत अतिशय मृदू स्वभावाचे आणि पेशाने उपक्रमशील शिक्षक आहेत.त्यांच्या बळी गेला रे या नाटकाचा विषय,त्यात मांडलेल्या व्यथा वेदना आणि संवाद काळजाला भिडणारे आहेत लेखक शेतकरी कुटुंबातील घटक असल्याने अनुभव अनूभूतीची वास्तव दाहकता त्यांच्या लेखनातून संहितेत अवतरली आहे.ते आंध्र आणि कर्नाटक सीमेलगतच्या भागातील रहिवासी असल्याने तिथल्या बोली भाषेचा लहेजा मोठ्या सहजतेने लेखनात आला आहे. कर्ज बळी या ग्रंथात बळी गेला रे आणि झुरन झुला या दोन्ही नाट्य संहितेचे एकत्रित रुप आले आहे.




वि.न.भोळे लिखित बळी गेला रे नाट्य कलाकृतीचा मुख्य विषय सध्याचे ग्रामीण जीवन ,शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जबाजारीपणा हाच आहे.दौलतराव नावाचा शेतकरी, त्याची पत्नी लक्ष्मीबाई,मुलगा शरद ह्या कुटुंबातील सदस्यांची एक भावनिक गुंफण असलेली कथा आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कष्टकरी शेतकऱ्यांचे जीवन सतत संकटांनी वेढलेले असते.

दौलतराव प्रामाणिक कष्टाळू असूनही तो अडचणीत कसा येतो, गावातील वाद, त्याच्यावर झालेला अन्याय आणि आर्थिक ओढाताण यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची होते.कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि शेती सुधारण्यासाठी त्याला कर्ज घ्यावे लागते.विहीर खोदून,शेतीत सुधारणा करून उत्पन्न वाढविण्याचे स्वप्न तो पाहतो.मात्र कर्जाची वाढती रक्कम ,सावकाराचे वाढते व्याज आणि नैसर्गिक आपत्ती अशा दुष्टचक्रात अडकल्याने त्याचे स्वप्न उध्वस्त होते...

**पुस्तक परीक्षण**

**पंडित पाटील बेळीकर**

नांदेड
मो. ९२८४१११७०५

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेणारे दलाल ,सावकार आणि सरकारी भ्रष्ट यंत्रणा याचे प्रत्ययकारी चित्रण या नाट्य लेखनात आलेले आहे.या लेखन प्रकारात संवाद नुसते लिहून चालत नाही तर रंगभूमीवर प्रदर्शित करण्यासाठी लागणारे सर्व कौशल्य पात्रांच्या तोंडी घालून घटना आणि प्रसंग उभे करावे लागतात हे करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. या ग्रंथात झुरन झुला या नाट्य संहितेचाही समावेश आहे यात बळी गेला रे याच नाट्यछटेतील पात्रे आहेत एका अर्थाने दोन नाट्य कलाकृतीची संयुक्त मालिकाच ही आहे.शेतकऱ्याच्या आत्महत्येनंतर त्याच्या कुटुंबाची परवड कशी होते याचे दर्शन प्रत्यक्ष त्या शेतकऱ्याला दाखविण्यासाठी फँटसीचा आधार घेऊन कलात्मक पद्धतीने रंगविला आहे.आत्म हत्ये नंतर दौलतराव या शेतकऱ्यालाआपल्या पश्चात झालेल्या कुटुंबाची परवड आणि दुःख पाहायला मिळते आणि पश्चात्ताप होतो. म्हणजे हे नाटक रंगभूमीवर पाहून मनात येत असलेलें आत्महत्येचे विचार दूर करण्यासाठी आवश्यक असे प्रबोधन ठरेल इतका महत्त्वाचा भाग लेखकांनी चितारला आहे.

मराठवाड्यातील बोलीभाषेच्या दृष्टीने बळी गेला रे आणि झुरन झुला ही दोन्ही नाटके अतिशय महत्वाची आहेत असे वाटते.या नाटकात मराठवाडी बोली भाषेचा सहज , नैसर्गिक आणि प्रभावी वापर केला त्यामुळे स्थानिक वास्तववादी जीवनाचा सुगंध आणि दाहक अनुभूतीची सत्यता प्राप्त झाली आहे. नाटककार वि. न. भोळे यांच्या नाट्य लेखनाला देगलूर येथील गणगोत प्रकाशन संस्थेने आकर्षक मुखपृष्ठासह ग्रंथरुपात प्रकाशन सिद्ध करून आपली परंपरा कायम ठेवली आहे . दोन सशक्त आणि मनाला अस्वस्थ करून सोडणाऱ्या नाट्य संहितेचे लेखन लेखक वि.न.भोळे यांनी केले ते अभिनंदनास पात्र आहेत.

**पुस्तकाचे नाव- कर्जबळी**
**लेखक- वि. न. भोळे**
**मुखपृष्ठ- संतोष घोंगडे**
**प्रकाशन-गणगोत प्रकाशन, देगलूर**
**किंमत- २५० रू.**

# वाचन कट्टा...

आजच्या डिजिटल युगात मोबाईल आणि सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांचा वाचनाकडे असलेला कल कमी होत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि सवय निर्माण करण्यासाठी वाचन कट्टा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरतो. वाचन कट्टा म्हणजे विद्यार्थ्यांनी नियमितपणे एकत्र येऊन विविध प्रकारची पुस्तके वाचणे, त्यावर चर्चा करणे आणि आपले विचार मांडणे. शाळा, महाविद्यालय किंवा ग्रंथालयात अशा गटांची स्थापना केल्यास विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा मिळते. प्रत्येक विद्यार्थी आपल्या आवडीचे पुस्तक वाचून त्याचा परिचय इतरांना करून देऊ शकतो.

या माध्यमातून विद्यार्थी एकत्र येऊन विविध पुस्तके वाचू शकतात, त्यांवर चर्चा आणि नवीन विचारांची देवाणघेवाण होते. वाचन कट्टा म्हणजे विद्यार्थ्यांनी नियमितपणे एकत्र येऊन पुस्तकांचे वाचन व त्यावरील विचार मांडण्याचे व्यासपीठ. सुरुवातीला कथा, गोष्टी, चरित्रे, विज्ञान, इतिहास अशा आवडीच्या पुस्तकांपासून वाचनाची सुरुवात करता येते. वाचन कट्ट्यामुळे विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढतो, भाषेवरील प्रभुत्व सुधारते आणि कल्पनाशक्ती विकसित होते. पुस्तकांवरील चर्चेमुळे आत्मविश्वास वाढतो तसेच विचार मांडण्याची आणि इतरांचे विचार समजून घेण्याची क्षमता विकसित होते. अशा उपक्रमांमुळे मोबाईलचा अनावश्यक वापर कमी कमी करून विद्यार्थी वाचन छंद जोपासू लागतील. अशा उपक्रमांमुळे वाचन आनंददायी बनते आणि विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, शिस्त व संवाद कौशल्य यांचाही विकास होतो.

वाचन कट्टा हा केवळ पुस्तक वाचण्याचा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे. तो ज्ञानवृद्धी, बौद्धिक विकास आणि चांगले संस्कार घडविण्यास मदत करतो. नियमित वाचनामुळे विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन व्यापक होतो. वाचाल तर वाचाल हा संदेश प्रत्येक विद्यार्थ्याने आचरणात आणला पाहिजे. प्रत्येक शाळेत वाचन कट्टा सुरू करून विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा दिल्यास सुजाण, विचारशील आणि जबाबदार नागरिक घडतील. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी वाचन कट्टा ग्रुप अत्यंत उपयुक्त ठरतो.

आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात वाचनाची सवय कमी होत आहे. अशा परिस्थितीत वाचन कट्टा ही संकल्पना वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते. वाचन कट्ट्यावर विद्यार्थी, शिक्षक आणि वाचनप्रेमी एकत्र येऊन पुस्तकांवर चर्चा अनुभव शेअर करतात आणि नवीन पुस्तकांची ओळख यामुळे वाचनाची गोडी निर्माण होते. सार्वजनिक ठिकाणी वाचन कट्टा सुरू झाल्यास समाजात ज्ञानाची देवाणघेवाण वाढेल आणि वाचनाची सवय दृढ होईल. वाचन कट्टा हा केवळ पुस्तकांचा नव्हे, तर विचारांचा आणि संस्कारांचा कट्टा आहे. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालयाने वाचन कट्टा सुरू करावा. अशा उपक्रमांमुळे ज्ञानसंपन्न, विचारशील आणि जबाबदार नागरिक घडण्यास निश्चितच मदत होईल.

**-श्रीकांत संभाजी मगर**
नांदेड.
मो. ९६८९११७१६९

# 'दीप अमावास्या' आणि श्रावणात मांसाहार न करण्याचे महत्व




हिंदूंच्या सर्वाधिक कुचेष्टा आणि विकृत विनोद यांचे जे सण आहेत, त्यात वटपौर्णिमेनंतर 'दीप अमावास्या' हा सण येतो. व्यक्तीगत पातळीवर ही अमावास्या साजरी करण्याचा प्रत्येकाला हक्क आहे; पण 'दीपपूजेच्या ऐवजी केवळ गटारी म्हणून याला सर्वत्र कुप्रसिद्धी मिळू नये', असे वाटते. आपण आपला धर्म, आपली संस्कृती, आपला सण यांचे का म्हणून विडंबन करायचे? उलट महाराष्ट्रातील सर्व जातींच्या लाखो घरांमध्ये मोठ्या भक्तीभावाने या दिवशी दीपपूजन केले जाते. त्यामुळे आपण आपल्या सणांचे विडंबन टाळायला हवे.

आपल्याकडे आषाढी अमावास्येच्या नंतर आहारात पालट केला जातो. या दिवसाला 'गताहारी (जो आहार गेला आहे तो) अमावास्या' असेही म्हणतात. आपल्या प्रत्येक सणांची नावे संस्कृतवर आधारित आहेत. 'गटर' हा इंग्रजी शब्द दीप अमावास्येला खोडसाळपणे जोडलेला आहे. 'आपली लायकी गटारात लोळायची आहे', असे आपल्याला हिणवले गेले आणि दुर्दैव हे आहे की, आपण ते खरे ठरवण्याच्या मागे लागलो आहोत. खरेतर आपण आपल्या महान हिंदू संस्कृतीची जाणीव ठेवायला हवी. आपल्या प्रत्येक सणाला विशेष महत्व आहे. आपल्या सणांची बरोबरी कुणीही करू शकत नाही. गत म्हणजे मागील, जुने, गेलेले, आता नाही ते. आहार म्हणजे भोजन. गत+आहार = गताहार. जसे शाक + आहारी = शाकाहारी, तसे गत + आहारी = गताहारी. गत + आहारी+अमावास्या=गताहारी अमावास्या. या दिवशी दीपपूजन करतात.

सहस्रो वर्षांची परंपरा असलेल्या आपल्या धर्मात याच्या मागचे विज्ञानही सामावलेले आहेच. पूर्वी या दिवशी मांसाहार करून गौरींच्या जेवणापर्यंत मांसाहार बंद ठेवला जात असे. बहुतेक प्राण्यांचा हा काळ म्हणजे प्रजननाचा काळ असतो. याच काळात प्राण्यांची हत्या केली, तर नवीन प्राणी जन्मालाच येणार नाहीत. मग वर्षभर खायला प्राणी मिळणार कुठून? याचा साऱ्या निसर्गचक्रावरच विपरीत परिणाम होतो. त्यामुळे कोळी बांधव या काळात मासेमारी करत नाहीत आणि शासकीय पातळीवरूनही मासेमारीवर बंदी घालण्यात येते. या दिवसांत बाहेरच्या दमट वातावरणामुळे प्राण्यांच्या शरिराच्या आत आणि त्वचेवर अनेक घातक जीवजंतू असण्याची शक्यता असते.

मांसाहारी पदार्थ शिजवतांना त्यांचा पूर्ण नाश न झाल्यास त्याचाही खाणाऱ्याला त्रास होऊ शकतो. मांस किंवा मासे नीट न ठेवल्यास वातावरणातील ओलावा आणि हवेतील वाढलेले जंतू यांमुळे त्यांच्या कुजण्याची प्रक्रिया अधिक वेगाने होते. आज विविध लसी, अत्यंत परिणामकारक प्रतिजैविके आणि औषधे उपलब्ध असूनही विविध संसर्गांना आवर घालणे कठीण झाले आहे. अनेक घातक रोगांच्या जीवघेण्या साथी या प्राण्यांच्या शरीरावर वाढणाऱ्या जंतूंमुळे पसरतात; म्हणून या दिवसांत मांसाहार टाळल्यास जंतू संसर्गाचा धोका अल्प होतो. अत्यंत दुर्मिळ आणि प्रकृतीला पोषक अशा अनेक भाज्या याच काळात उगवतात.

संपूर्ण वर्षभरात या भाज्या पुन्हा पहायलाही मिळत नाहीत. शाकाहार केल्यामुळे अशा भाज्या आपोआपच खाल्ल्या जातात. तुलनेने शाकाहाराचे या दिवसांत नीट पचन होते. विविध उपवासांच्या दिवशी खाल्ल्या जाणाऱ्या कंदमुळांच्या आहारामुळे त्यातील अनेक दुर्मिळ खनिजे आणि उपयुक्त पोषक घटक आपोआप शरिराला लाभतात. कायम मांसाहार करणाऱ्यांच्या पचनसंस्थेवर नेहमी येणारा ताण या शाकाहारी पालटांमुळे काही काळ कमी होतो. अशा सर्व कारणांमुळे दीप अमावास्येला धार्मिक जोड दिल्यास आपोआपच निसर्गाचा तोल साधला जातो. त्यामुळे दीप अमावास्येची कुप्रसिद्धी टाळा आणि धार्मिक वृत्ती वाढवणारा श्रावण मास जरूर पाळा !

**-सौ. मोक्षदा घाणेकर,**
काळाचौकी, मुंबई

## सूचना
### महाराष्ट्र शासन
### नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९.०६.२०२६

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-१८२२/प्र.क्र.०४/२०२२/कलम ३७(१कक)(क)/सूचना/नवि-१३:-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख "उक्त युडीसीपीआर नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/ वियो. व प्रायो./कलम ३७(१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त युडीसीपीआर नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या कृषी पर्यटन धोरणाची अंमलबजावणी (राज्यातील प्रादेशिक योजनांच्या बाबतीत) होण्याच्या दृष्टीने उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये विनियम क्रमांक २.१.२(xvi) ही तरतूद समाविष्ठ करण्याबाबत शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८२२/प्र.क्र.०४/२०२२/नवि-१३, दि.०२/०६/२०२२ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २०(३) व कलम ३७(१) सह कलम १५४ अन्वये निदेश पारित केलेले आहेत.;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्याच्या कृषी पर्यटन धोरणाची अंमलबजावणी (राज्यातील प्रादेशिक योजनांच्या बाबतीत) होण्याच्या दृष्टीने उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये विनियम क्रमांक २.१.२(xvi) ही तरतूद समाविष्ठ करण्याबाबत शासनाच्या नगर विकास विभागाने शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८२२/प्र.क्र.०४/२०२२/कलम-२०(४)/अधिसूचना/नवि-१३, दि.२५/०६/२०२६ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) अन्वयेची अंतिम अधिसूचना निर्गमित केलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये उक्त दि.०२/०६/२०२२ अन्वये पारित केलेल्या निदेशानुसार राज्यातील प्रादेशिक योजना क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित इतर सर्व नियोजन प्राधिकरणांच्या / सर्व वि शेष नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्याच्या कृषी पर्यटन धोरणाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने संबंधित नियोजन प्राधिकरणांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर प्रस्तावामध्ये राज्यातील प्रादेशिक योजना क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित इतर सर्व नियोजन प्राधिकरणांच्या / सर्व वि शेष नियोजन प्राधिकरणांच्या क्षेत्राकरिता उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये विनियम क्रमांक २.१.२(xvi) ही तरतूद समाविष्ट दृष्टीकोनातून उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक)(क) अन्वये फेरबदलाची सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करणे आवश्यक आहे. असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तद्नुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात येत आहे) असे शासनाचे मत झाले आहे;

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील .

१. विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग.
२. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
४. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
५. सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे
६. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.
७. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

(प्रणव कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

### परिशिष्ट-अ

**शासन सूचना क्र.टिपीएस-१८२२/प्र.क्र.०४/२०२२/कलम ३७ (१कक)(क)/सूचना/नवि-१३, दि.२९.०६.२०२६ सोबतचे सहपत्र**

**The following New Regulation No. 2.1.2 (xvi) is proposed to be added after Regulation No. 2.1.2(xv) as follows**

1) Regulation No.2.1.2 - Permission not necessary - No such permission shall be necessary for :- (xvi) Construction upto 8 rooms for Agro Tourism Centre and allied activities as per Tourism Policy - 2016 in Agricultural Zone, subject to compliance as per Appendix- K -2 below :

APPENDIX 'K - 2'

APPROVALS OF BUILDING PERMISSION FOR CONSTRUCTION UPTO 8 ROOMS FOR AGRO TOURISM CENTER AND ALLIED ACTIVITIES AS PER TOURISM POLICY -2016

| Sr. No. | Parameters to be considered | Description | |
|---|---|---|---|
| 1 | Agricultural Plot area & No. of Rooms | Plot area | No. of Rooms |
| | | (i) Upto 0.8 Ha.<br>(ii) 0.8 Ha. upto 1.6 Ha.<br>(iii) 1.6 Ha. & above | (i) Max. 04<br>(ii) Max. 06<br>(iii) Max. 8 & 2 Dormitories |
| 2 | Buildability of Plot | Plot should be buildable in view of the provisions in Regulation No.3.1 of UDCPR. | |
| 3 | Zone in Development Plan / Regional Plan | Agricultural Zone | |
| 4 | Type of Building | Residential & Allied Amenities for Agro Tourism Centre. | |
| 5 | Front, side and rear open spaces, access, parking and other requirements. | As per the provisions of UDCPR. | |
| 6 | Storeys allowed. | G. F. + 1 floor. | |
| 7 | FSI | Area of rooms should be minimum 150 sq.m. and Area of dormitories should be minimum 65 sq.m. to 75 sq.m. However, total construction should be within maximum FSI of 0.2 of gross plot area + along with ancillary area FSI thereon. | |
| 8 | Submission of Application for approval. | Applicant shall submit the intimation letter as per Appendix- K-1 of UDCPR along with -<br>i) Ownership document.<br>ii) Copy of measurement plan of plot.<br>iii) Building plan showing periphery of construction (P-line) floor wise and details of property, FSI calculation as mentioned in Proforma-I with the signature of owner and licensed personal.<br>iv) Copy of receipt of development charges including labour cess paid to Authority, if any.<br>v) The certificate of licensed personal stating that the proposal is strictly in accordance with the provisions of UDCPR.<br>No more details shall be necessary. | |
| 9 | Issue of Commencement Certificate/ Approval. | The receipt of application along with the required documents and fees / charges mentioned in 8 above, by the authority shall be treated as permission for development. | |
| 10 | Plinth Checking | Plinth Checking shall not be required. | |
| 11 | Occupation Certificate | After completion of the work, the owner shall intimate to the Authority about the occupation of the building. | |

Note : -

## NOTICE
### Government of Maharashtra
### Urban Development Department
Mantralaya, Mumbai - 400 032
Dated: 29.06.2026

*The Maharashtra Regional & Town Planning Act, 1966*

**No.TPS-1822/CR.04/2022/Sec.37(1AA)(a)/Notice/UD-13:-** Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR)(hereinafter referred to as "the said UDCPR Regulations") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, & some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No.TPS-1818/CR.238/18/DP. & RP./Sec.37 (1AA) (c) & sec.20(4)/UD-13, dated 02/12/2020 and the said UDCPR regulations are come into force from dt.03.12.2020;

And whereas, with a view to implement the Agro-Tourism Policy of the State of Maharashtra (in respect of Regional Plans in the State), the State Government in Urban Development Department vide Government Notification No. TPS-1822/C.R.04/2022/ UD-13, dated 02/06/2022 had issued directives under Section 20(3) and Section 37(1) read with Section 154 of the said Act, regarding inclusion of the provision of Regulation No. 2.1.2(xvi) in the said UDCPR Regulations;

And whereas, with a view to implement the Agro-Tourism Policy of the State of Maharashtra (in respect of Regional Plans in the State), the State Government in Urban Development Department vide Government Notification No.TPS-1822/C.R.04/2022/Sec-20(4)/Notification/UD-13, dt.25/06/2026 had issued Notification under Section 20(4) of the said Act, regarding inclusion of the provision of Regulation No. 2.1.2(xvi) in the said UDCPR Regulations;

And whereas, since, the concerned Planning Authorities have not initiated modification proceedings u/s 37(1) of the said Act as per the directives issued by the State Government vide dt.02.06.2022 u/s Section 37(1) of the said Act, within the area under all Planning Authorities / all special Planning Authorities in the State excluding Reginoal Plan area Therefore, to complete the Statutory procedure within the area under all Planning Authorities / all special Planning Authorities in the State excluding Reginoal Plan area in the State regarding inclusion of the provision of Regulation No.2.1.2(xvi) in the said UDCPR Regulations, the State Government is of the opinion that it is necessary to issue a separate notice in respect of the u/s 37(1AA)(a) of the said Act (hereinafter referred to as "the said modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA) of the said Act and all other powers enabling in that behalf, the Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the said modification. Any objections/suggestions upon the said proposed modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as an Officer to hear objections/suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government.

This notice is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.

1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkan / Pune/ Nagpur / Nashik / Amravati / Chhatrapati Sambhaji Nagar Division .
2. The Commissioners All concerned Municipal Corporations. (Except.Brihinmumbai Municipal Corporation)
3. Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
4. Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor, World Trade Centre, Mumbai-.5
5. All Special Planning Authorities
6. The Chief Executive Officer, All Zilla Parishads.
7. The Chief Officers, All Municipal Councils/ Nagar Panchyats.

This Notice is also available on the Government website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

*By order and in the name of the Governor of Maharashtra.*

(Pranav Karpe)
Deputy Secretary to Government

### Schedule-A

**Government Notice No. TPS-1822/CR.04/2022/Sec.37(1AA)(a)/Notice/UD-13, Dt.29.06.2026**

**The following New Regulation No. 2.1.2 (xvi) is proposed to be added after Regulation No. 2.1.2(xv) as follows**

1) Regulation No.2.1.2 - Permission not necessary - No such permission shall be necessary for :- (xvi) Construction upto 8 rooms for Agro Tourism Centre and allied activities as per Tourism Policy - 2016 in Agricultural Zone, subject to compliance as per Appendix- K -2 below :

APPENDIX 'K - 2'

APPROVALS OF BUILDING PERMISSION FOR CONSTRUCTION UPTO 8 ROOMS FOR AGRO TOURISM CENTER AND ALLIED ACTIVITIES AS PER TOURISM POLICY -2016

| Sr. No. | Parameters to be considered | Description | |
|---|---|---|---|
| 1 | Agricultural Plot area & No. of Rooms | Plot area | No. of Rooms |
| | | (i) Upto 0.8 Ha.<br>(ii) 0.8 Ha. upto 1.6 Ha.<br>(iii) 1.6 Ha. & above | (i) Max. 04<br>(ii) Max. 06<br>(iii) Max. 8 & 2 Dormitories |
| 2 | Buildability of Plot | Plot should be buildable in view of the provisions in Regulation No.3.1 of UDCPR. | |
| 3 | Zone in Development Plan / Regional Plan | Agricultural Zone | |
| 4 | Type of Building | Residential & Allied Amenities for Agro Tourism Centre. | |
| 5 | Front, side and rear open spaces, access, parking and other requirements. | As per the provisions of UDCPR. | |
| 6 | Storeys allowed. | G. F. + 1 floor. | |
| 7 | FSI | Area of rooms should be minimum 150 sq.m. and Area of dormitories should be minimum 65 sq.m. to 75 sq.m. However, total construction should be within maximum FSI of 0.2 of gross plot area + along with ancillary area FSI thereon. | |
| 8 | Submission of Application for approval. | Applicant shall submit the intimation letter as per Appendix- K-1 of UDCPR along with -<br>i) Ownership document.<br>ii) Copy of measurement plan of plot.<br>iii) Building plan showing periphery of construction (P-line) floor wise and details of property, FSI calculation as mentioned in Proforma-I with the signature of owner and licensed personal.<br>iv) Copy of receipt of development charges including labour cess paid to Authority, if any. | |


(उर्वरित पान ५ वर...)

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# सणासुदीत दिसा सेलिब्रिटींसारखे सुंदर

**सणासुदीच्या काळात प्रत्येकाला सुंदर दिसण्याची इच्छा असते. त्यासाठी आपण पार्लरमध्ये फेशियल आणि इतर सर्व काही करून घेतो. परंतु, मेकअपसाठी खूप वेळ पार्लरमध्ये जाणे शक्य नसते. त्यामुळे अनेक महिला घरीच मेकअप करतात. सध्या श्रावण सुरू आहे. तुम्हीही घरी मेकअप करणार आहात का? तसे असेल, तर आज आम्ही तुमच्यासाठी काही मेकअप टिप्स घेऊन आलो आहोत; ज्या फॉलो करून तुम्ही घरीच मेकअप करून सेलिब्रिटींसारखे सुंदर दिसू शकता. मेकअपमध्ये लेअरिंग खूप महत्त्वाचे असते. लेअरिंग योग्य पद्धतीने झाल्यास पुढील मेकअप नीट करता येतो. लेअरिंग म्हणजे तुम्ही कोणत्या मेकअप प्रोडक्ट्सचा वापर कसा करायचा याचा क्रम. मेकअपचे विविध प्रॉडक्ट्स वापरण्याचा क्रम योग्य असल्यास तुम्ही चांगल्या प्रकारे मेकअप करू शकता.**



## 'या' सोप्या मेकअप स्टेप्स...


- सर्वप्रथम मेकअपसाठी चेहरा नीट स्वच्छ करून घ्या. त्यानंतर चेहऱ्यावर तुम्ही सीरम, मॉइश्चरायझर किंवा सनस्क्रीनचा वापर करा. मग मेकअप प्रॉडक्टचा वापर करा; ज्यात प्रायमर, फाउंडेशन, कन्सिलर, लिक्विड ब्लश, हायलायटर यांसारख्या गोष्टींचा समावेश असतो.
- आता शेवटी मेकअप सेट करण्यासाठी पावडर वापरून, ते सील करण्यासाठी मेकअप सेटिंग मिस्ट वापरा. पण, यातील एकही स्टेप तुम्ही गाळलीत; जसे की त्वचेवर मॉइश्चरायझर न लावणे किंवा आधी पावडर लावणे, तर तुमचा मेकअप खूप खराब दिसू शकतो. त्यामुळे लेअरिंगबाबत काळजी घ्या. चला तर मग जाणून घेऊ मेकअप लेअरिंग कसे करायचे ते?
- सर्वप्रथम मेकअप बेस खूप स्मूद असणे गरजेचे आहे. त्यासाठी त्वचा हायड्रेट करा. तुमचा चेहरा मेकअपसाठी रेडी करताना प्रथम तुमचा चेहरा हलक्या क्लिंजरने धुऊन घ्या. आता टोनर आणि मॉइश्चरायझरचा वापर करा.
- आता स्मूद मेकअप बेससाठी प्रथम चेहऱ्यावर प्रायमर लावा; जेणेकरून मेकअप तुमच्या त्वचेच्या थेट संपर्कात येणार नाही.
- त्वचेच्या रंगानुसार स्किन करेक्टर निवडा आणि त्यावर फाउंडेशन लावणे टाळा; त्याऐवजी कन्सीलर लावा आणि ब्लेंड करण्यासाठी फाउंडेशन लावा. फाउंडेशनही नेहमी तुमच्या त्वचेच्या रंगाशी मॅच असणारे हवे.
- ब्लेंड करण्यासाठी तुम्ही ब्रश किंवा स्पंजचा वापर करा. चेहऱ्यावर डाग किंवा डार्क सर्कल असतील, तर ते कन्सिलरच्या मदतीने लपवा. डार्क सर्कलसाठी हलक्या रंगाचे कन्सिलर वापरा.
- आता फाउंडेशन आणि कन्सिलर सेट करण्यासाठी सेटिंग पावडर वापरा. त्यामुळे मेकअप बराच वेळ सेट राहील. आता गालावर ब्लश लावा. ब्लश नेहमी खालून वर लावत जायचा. त्यानंतर डोळ्यांवर आयलायनर आणि पापण्यांवर मस्करा लावा.
- तुम्ही तुमच्या आवडीनुसार लिक्विड, पेन्सिल किंवा जेल आयलायनर लावू शकता. सर्वात शेवटी ओठांना लिपस्टिक किंवा लिपग्लॉस लावा. तुमच्या ओठांच्या रंगाशी जुळणारी लिपस्टिक निवडा. मेकअप पूर्ण झाल्यानंतर सेटिंग स्प्रेसह मेकअप लॉक करा.

## सणासुदीला सगळ्यांमध्ये उठून दिसण्यासाठी खास टिप्स

- साडी नेसण्याचा विचार करत असाल तर कोणती साडी तुम्हाला शोभून दिसेल, तसेच कोणत्या रंगाची साडी तुमच्या त्वचेच्या रंगाला शोभेल याचा विचार करा.
- गणपती, नवरात्रीच्या काळात पाऊस अधूनमधून पडत असतो. त्यामुळे अशा वातावरणात जास्त भरजरी वर्क केलेली साडी नेसणे शक्यतो टाळाच.
- नऊवारी साडी नेसण्याचा विचार करत असाल तर ती शिवून देखील घेऊ शकता.



- ड्रेस किंवा इतर काही घालण्याचा विचार करत असाल तर ऑनलाईन शॉपिंग साईट्सवर तुम्हाला स्कर्ट-ब्लाऊज, किंवा लांब कुर्ती, घेरदार अनारकली असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.
- आजकाल काही ऑनलाईन साईट्समार्फत मोठमोठ्या फॅशन डिझाईनर्सने डिझाईन केलेल ड्रेस भाड्यानेदेखील घेता येतात.
- तुम्ही परिधान केलेल्या कपड्यांवर दागिने घालताना त्यांची विचार करून निवड करा. साडी असो वा ड्रेस त्यावर हातात डझनभर बांगड्या घालण्यापेक्षा एखादा कडाही हातात शोभून दिसेल.
- गळ्यात एखादी नाजूकशी साखळीची सर घातल्याने गळा मोकळा वाटणार नाही.
- कानात ऑक्साईडचे सोनेरी किंवा चंदेरी रंगाचे मोतीजडित झुमके तुम्ही घातलेल्या कोणत्याही ड्रेसवर किंवा साडीवरही शोभून दिसतील.
- सतत दर सणासुदीला झुमके घालून तुम्ही कंटाळला असाल तर त्या त्या ड्रेसवर शोभतील असे रंगीत बटणाच्या आकाराचे कानातले तुम्ही घालू शकता.
- जास्त मेकअप करण्यापेक्षा कधीकधी फक्त डोळ्यांना काजळ लावल्याने व एखादी गडद रंगाची लिपस्टिक लावल्यानेदेखील सौंदर्य खुलते.



## बहुपयोगी कुर्ते

लांब कुर्ते हे यातलं प्रमुख आकर्षण. स्ट्रेट फिटमध्ये लांब साइड कट, ए-लाइन किंचित घेरेदार कुर्ते हा सध्याचा मुख्य ट्रेण्ड आहे. सोबत शर्ट स्टाइल कुर्ते, सेमी अनारकली, अंगरखा स्टाइल कुर्तेसुद्धा बाजारात दिसत आहेत. रोजच्या वापरासाठी सुटसुटीतपणा ही मुख्य बाब नजरेत ठेवूनसुद्धा यांच्यावरील नाजूक नक्षीकाम, मोठ्या प्रिंट किंवा गडद रंग पटकन नजरेत भरतात. या कुर्त्यांची मुख्य खासियत म्हणजे साधारणपणे गुडघ्याच्या उंचीपर्यंत असल्याने तुम्ही ड्रेस म्हणून वापरू शकता. सलवार आणि दुपट्टा घेऊन सलवार सूट बनवू शकता किंवा धोती पँट, प्लॅझो, स्कर्टसोबत हटके लुकसुद्धा करू शकता. शर्ट ड्रेस स्टाइलचा कुर्ता श्रग म्हणूनसुद्धा वापरता येतो. हे प्रयोग करताना एथनिक लुक आणि ऑफिस लुक हा समतोलसुद्धा साधता येतो. नारंगी रंगाचा लेहरीया, बांधणी प्रिंटच्या कुर्त्यांसोबत डेनिम जॅकेट आणि मोठाले झुमके असा साधासा पेहराव ऑफिसमध्ये घालता येतो. घरच्या कार्यक्रमासाठी याच कुर्त्यांसोबत धोती पँट आणि चांदीचा ऑक्सिडाइज नेकलेस आणि गडद लिपकलर वापरता येतो. चिकनकारी, कुर्त्यांच्या रंगाचं नाजूक नक्षीकाम, नाजूक मण्यांचं नक्षीकाम या कुर्त्यांवर खुलून दिसतं. बाटिक, मधुबनी पिंट्र, लेहरीया, बांधणीचे कुत्रेसुद्धा अशा वेळी वापरता येतात. सिल्कच्या मोठ्या डिजिटल प्रिंटच्या उजळ कुर्त्यांवर छानसा नेकपीस किंवा लांब कानातले डूलसुद्धा खुलून दिसतात. तसंच ऐन समारंभात पोहोचून वेगळे दागिने किंवा देखण्या हेअरस्टाइलने वेगळा लुकसुद्धा मिळतो. लिपकलर किंवा आय मेकअपनेसुद्धा वेगळेपणा उठून दिसतो.

## खादी आणि हँडलूमचा प्रभाव

सध्या खादी आणि हँडलूम कापडाचा प्रभाव बहुतांश पेहरावात पाहायला मिळतोय. विशेषतः महाराष्ट्रीय, दक्षिण भारतीय मोठाले प्रिंट्स, भौमितिक आकार, मोठ्या काठाच्या साड्या चलतीत आहेत. कॉटन, लिनिन, खादी साड्या वापरायला सुटसुटीत असतात. त्यांच्या गडद रंगांनी लक्ष वेधून घेतात. त्यावर नक्षीकाम केलेले ब्लाऊज मिक्स-मॅच करून सहज घालता येतात. गेल्या काही वर्षांपासून भारतातील पारंपरिक कला, चंदेरी, टसर सिल्कसारख्या साड्यांबद्दल तरुणाईमध्ये आकर्षण वाढतंय. त्यामुळे कित्येक ऑनलाइन साइट्सवर अशा साड्या विक्रीस उपलब्ध होत आहेत. यंदाच्या सणांच्या मौसमात या साड्या आवर्जून पाहायला मिळतील. साड्यांच्या स्टायलिंगमध्येही वेगळेपणा आणला जातोय. पारंपरिक ब्लाऊजऐवजी शर्ट्सरूपाचा प्रिंटेड कुर्ता किंवा क्रॉप टॉप घालता येईल. साडीवर एखादा श्रग घालता येईल किंवा साडीशी मिळताजुळता दुपट्टा दुसरा पदर म्हणून खांद्यावर घेता येईल. सध्या लांब पदराचा ट्रेण्ड आहे. हँडलूम साड्यांचा रंग काहीसा गडद असतो. चांदीचे ऑक्सिडाइज दागिने किंवा रंगीत खड्यांचे दागिने या साड्यांवर खुलून दिसतात. गेरू रंगाचे सोन्याचे दागिने, मीनाकारी नक्षीचे दागिनेसुद्धा वापरता येतात.

## छोट्याशा बदलाचा परिणाम

एखाद्या छोटेखानी समारंभात भरजरी ड्रेस किंवा साडी नेसणं कधीतरी नकोसं वाटतं. अशा वेळी तुमच्या नेहमीच्या स्टाइलमध्ये केलेला एखादा छोटासा बदलही लोकांच्या नजरेत येतो. सध्या लेगिंग आणि कुर्ता हे समीकरण अगदीच जिव्हाळ्याचं झालं आहे. पण सुरती वर्क, जरदोसी किंवा फुलकारी नक्षीकाम केलेला भरगच्च दुपट्टा तुमच्या कपाटात असू द्या. एखाद्या सिंपल ड्रेसवरसुद्धा हा दुपट्टा उठून दिसतो. सोबत छान दागिने घातले की पारंपरिक लुक सहज होतो. एखाद्या ए-लाइन वन पीस ड्रेसवरसुद्धा असे दुपट्टे खुलून दिसतात. तसंच नेहमीच्या लेगिंगला पटियाला, धोती पँट किंवा सध्या प्रचंड लोकप्रिय असलेल्या शराराचा पर्याय द्या. कधीतरी गळ्यात नेकपीस घालण्याऐवजी नाजूक स्कार्फ बांधा किंवा हातात घडाळ्याऐवजी छान बांगड्या घाला. ऑफिसच्या कामात मधूनच ऐकू येणारा बांगड्यांचा आवाज आपल्याला आणि शेजारच्यालाही सुखावतो. एखादी सुंदर हेअरपिन किंवा कर्णफूल केसात माळा. असे छोटे बदलसुद्धा पटकन नजरेत येतात. यासाठी विशेष मेहनत घ्यावी लागत नाही.

## ट्रायबल दागिने

पारंपरिक सोन्याच्या दागिन्यांना सध्या चांदीच्या दागिन्यांचा पर्याय मिळू लागला आहे. यंदा त्यात भर पडली आहे ती ट्रायबल स्टाइलच्या दागिन्यांची. आदिवासी पाडे, तिबेटीयन स्टाइल दागिने, बंजारा जमातीतील दागिन्यांचं नक्षीकाम सध्या दागिन्यांमध्ये पाहायला मिळतं. यामुळे दागिने बोल्ड दिसतात. भौमितिक आकार, वेगळी कलाकुसर यामुळे ते उठून दिसतात. हे वेगळेपण नेहमीच्या ड्रेसलासुद्धा उठाव आणतं. याला जोड म्हणून मोठाले रंगीत मणी, खड्यांचा वापर दागिन्यात होत आहे. टेम्पल ज्वेलरी पुन्हा नजरेत येतेय. विशेष म्हणजे पारंपरिक दागिन्यांचे प्रकार वगळता हातफूल, कर्णफूल, केसांत खोचायची पिन, अंगठी, जोडवी, कंबरपट्टा, चोकर अशा पठडीबाहेरील दागिन्यांची सध्या चलती आहे. साध्याशा नथीमध्येही सध्या सुंदर पर्याय पाहायला मिळताहेत. या दागिन्यांच्या प्रकारामुळे पेहरावातील वेगळेपणा उठून दिसतो.

# उत्सवात पारंपरिक कपड्यांचा साज

**सध्या श्रावण सुरू आहे. लागोपाठ येणाऱ्या सणांची लगबग सुरू आहे. त्यासोबतच पेहरावात स्टाइलइतकीच सुटसुटीतपणाच्या नियोजनाची धावपळसुद्धा सुरू आहे. यंदाचा कम्फर्ट ड्रेसिंगचा पर्याय याच मुद्द्याला अधोरेखित करतो...**

आदल्या दिवशी बॉसकडून अर्ध्या दिवसाच्या सुट्टीची परवानगी घेतलेली असते. त्यामुळे कामं आटोपण्यासाठी वेळेच्या थोडं आधी ऑफिस गाठलेलं असतं. ऑफिसमधून निघायची वेळ झाली, तरी सकाळपासून कोसळणारा पाऊस काही थांबायचं नाव घेत नाही. ताईच्या मंगळागौरीला अशा पावसात पोहोचायचं म्हणजे चिखलाने ड्रेस खराब होणार, मेकअप, केस विस्कटणार. बरं तिथे गेल्यावर आधीच कार्यक्रम सुरू झालेला असल्याने कपडे बदलण्याची संधीही मिळणार नाही.



श्रावणासोबत सुरू होणाऱ्या सणांची रांग थेट दसऱ्यापर्यंत येऊन थांबते. दरम्यान नवे कपडे, छान लुक, फक्कड मेजवानी, भरपूर गप्पा, भेटीगाठी यांची रंगत वाढायला लागते. यादरम्यान प्रत्येक सणाला हक्काची सुट्टी काही मिळत नाही. त्यामुळे ऑफिस ते घर कसरत सांभाळायची. त्यात पाऊस असला तर विचारायची सोय नाही. बरं कधीतरी हौस म्हणून घातलाच अनारकली किंवा एखादी महागडी साडी नेसली तर नंतर त्यावरची चिखलाची नक्षी काढायचा सोहळा काही सुटत नाही. त्यामुळे कितीही हौस असली तरी या दिवसांत दिवाळीसारखं फुरसतीने नटण्याची हौस काही पूर्ण करता येत नाही. त्यामुळे अशा वेळी पारंपरिक पेहरावाची हौस पूर्ण करतानासुद्धा तो ऑफिससाठी साजेसा असेल आणि प्रवासादरम्यान अडथळा होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागते. त्यासाठी थोड्या नव्या शकला लढवाव्या लागतात. यंदाचा हंगाम अशाच नव्या कल्पनांचा आहे.

मधल्या दोन-तीन महिन्यांमध्ये बाजारातील कपड्यांच्या दुकानांत चक्कर मारली असेल, तर एक बाब प्रकर्षाने लक्षात येईल की अनारकली, लेहेंगा, फँसी साड्या यांचे नेमके पर्यायच दुकानांमध्ये आले आहेत. त्याऐवजी लांब कुर्ते, ए-लाइन ड्रेसेस, शरारा, कॉटन पँट, चुडीदार असे सुटसुटीत कपड्यांचे प्रकार पाहायला मिळताहेत. घेरेदार, स्टायलिश पारंपरिक कपडे यायची सुरुवात अजून दोन-तीन महिन्यांनंतर दिवाळी, लग्नाच्या मौसमात होईल. पण त्याआधी येणारे गणपती, मंगळागौर, नवरात्री, दसरासारख्या सणांमध्ये पेहराव दिमाखदार असण्यापेक्षा सुटसुटीत असेल, याकडे जास्त लक्ष दिलं जातं. कारण या दरम्यान सणांची संख्या मोठी असली तरी सुट्ट्या नसतात. कॉलेज नुकतंच सुरू झालेलं असतं, ऑफिसमधल्या सुट्ट्या, पर्यटनवाऱ्यांमध्ये गुंतलेली मनं आता कामाला लागलेली असतात. ऑफिस आणि सण दोन्ही सांभाळायची कसरत करायची असते. यामुळे सुटसुटीत पण आकर्षक असे कपड्यांचे पर्याय बाजारात यायला लागले आहेत.

- **मुळात आपल्याकडील असंख्य सणांचं निमित्त एकच असतं, या कारणाने कुटुंब, नातेवाईक, मित्र-मैत्रिणींनी एकत्र येऊन चार क्षण निवांत एकत्र घालवावेत. अर्थात अशा वेळीच गर्दीत भाव खाण्याची संधी असते. ती संधी पेहरावाच्या छोट्या क्लृप्त्यांनी मिळवता येते. ही संधी यंदा चुकवू नका!**

## गणपतीमध्ये करा ट्रेंडी इंडो-वेस्टर्न स्टाइल

**फेस्टिव्हल फॅशन म्हणून नावारूपाला आलेले कपडे ट्रेंडी तर आहेतच पण सणापुरते अंगावर आणि बाकीचे दिवस कपाटात असं यांच्याबाबतीत करण्याची गरज भासत नसल्याने हा इंडो-वेस्टर्न फॅशन अवतार सध्या भलताच ट्रेंडिंग आहे. साडी, सलवार-कमीज अशा वेगवेगळ्या प्रकारांत हटके प्रयोग दिसून येतात. बाकीच्या दिवशी कितीही वेस्टर्न कपडे घालणारे आपण सणावाराला मात्र पारंपरिक कपडेच घालणं पसंत करतो.**



- साडी : फॅशनविश्वचे चक्र पुन्हा फिरून जुन्या काळातील फॅशनकडे वळतेच. फक्त जुनी फॅशन नव्याने येताना त्यात काही तरी नवीन एलिमेंट असतो. अशा प्रकारे साडीमध्येही ऐंशी आणि नव्वदच्या दशकातील ट्रेंड पुन्हा आला आहे. त्या काळातील सिल्कच्या साड्यांना थोडा नवीन टच देऊन अनेक डिझायनर्सनी वेगवेगळ्या प्रकारे साडी बाजारात आणली आहे.
- सलवार कमीज : धोती पॅन्ट्सची फॅशन काही वर्षांपूर्वी बाजारात आली होती. आता तीच फॅशन थोडा हटके लुक घेऊन पुन्हा ट्रेंडमध्ये आली आहे. या धोती पँट्सवरती तुम्ही क्रेप, पारंपरिक टॉप, कुर्ती, केप, फ्रंट आणि साइड कट कुर्ती घालू शकता.
- इंडोवेस्टर्न फॅशन गाऊन्स : बाजारात पारंपरिक गाऊन्सही इंडियन गाऊन्स या नावाने उपलब्ध आहेत. हे गाऊन्स छोटे ते मोठे असे कोणत्याही वयोगटाच्या पसंतीला उतरलेले आहेत. गाऊन्समध्ये कॉटन, बोल्ड, शायनी मटेरियल, नेट अशा कपड्यांबरोबरच सिल्कचे वेगवेगळे प्रकार, खादी, कांजीवरम आणि अगदी वेल्वेटसारखा लुक देणारे कापड फॅशन कलेक्शनमध्ये आले आहेत.
- प्लाझो आणि कुर्ती- टॉप : साधी ब्राइट रंगाची प्लाझो आणि त्यावर फ्रंट कट कुर्ती, स्ट्रेट कट कुर्ती, शॉर्ट कुर्ती, असमान हेमलाइन असलेली कुर्ती ट्रेंडमध्ये आहेत. अशाच प्रकारे पारंपरिक हातमागावरील कपड्यांपासून बनवलेल्या प्लाझो पँट्स, साडीपासून बनवलेली प्लाझो यावर तुम्ही वेस्टर्न टॉप घालू शकता.
- टॉप आणि स्ट्रेट पँट्स : स्ट्रेट पँट हा प्लाझोचाच छोटा प्रकार आहे. स्ट्रेट पँट्स आणि वेस्टर्न टॉपही ट्रेंडमध्ये आहेत. स्ट्रेट पँट्सवर तुम्ही पारंपरिक प्रिंट असलेला टॉप, क्रॉप टॉप घालू शकता. या लुकवर लाँग किंवा शॉर्ट जॅकेट्स घालून हटके लुक मिळवू शकता. टॉप आणि स्ट्रेट पँट्सवर तुम्ही ओढणीही वेगवेगळ्या पद्धतीने ड्रेप करू शकता.



# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी शिक्षण विभागाला धरले धारेवर



**लोहा (प्रतिनिधी)–** शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना गती देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे राज्याध्यक्ष तथा शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी सोमवारी जिल्हा परिषद नांदेड येथे आक्रमकपणे आढावा घेत संबंधित जि. प. प्रशासनाला धारेवर धरले.

शिक्षकांचे प्रश्न प्रलंबित का आहेत? अडचण नेमकी काय आहे? मार्गदर्शनपर पत्र आहे का? प्रश्न सुटत नसतील तर त्याची कारणे स्पष्ट करा, असा स्पष्ट सवाल करीत त्यांनी प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

शिक्षक सेनेच्या वतीने शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर बैठक घेण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या दालनात, त्यांच्या उपस्थितीत शिक्षण विभागातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी तसेच लेखा विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्या उपस्थितीत ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत चट्टोपाध्याय व निवड श्रेणी, वेतनश्रेणी, थकीत पगार व वेतनवाढीची बिले, वैद्यकीय बिलांचा प्रलंबित प्रश्न, सेवानिवृत्त शिक्षकांची प्रकरणे, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिविअ पदे भरणे, माध्यमिक शिक्षकांच्या GPF स्लिप, जुनी पेन्शन योजना, प्राथमिक शिक्षकांच्या NPS रकमेचा GPF खात्यात भरणा, NPS खाते बंद करण्याची कार्यवाही, विषय शिक्षकांना वेतनश्रेणी तसेच अतिरिक्त शिक्षकांच्या पदस्थापनेचा प्रश्न आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच शिक्षकांना BLO व इतर अशैक्षणिक कामे देऊ नयेत, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

अतिरिक्त शिक्षकांच्या पदस्थापनेच्या प्रश्नावर मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी सकारात्मक भूमिका घेतली. एकही शिक्षक पदस्थापनेपासून वंचित राहता कामा नये, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे कोणतेही प्रश्न प्रलंबित ठेवू नयेत आणि संबंधित प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत, असेही त्यांनी निर्देशित केले.

यावेळी नांदेड जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार केला. शिक्षकांच्या प्रश्नांसाठी झालेल्या या बैठकीमुळे अनेक प्रलंबित प्रश्नांना निश्चितच गती मिळेल, असा विश्वास शिक्षक बांधवांनी व्यक्त केला.

यावेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, शिवसेना नेते प्रकाश मारावार, सुनील कदम, दिलीप घुगे, सुनील पेनूरकर, संतोष अंबुलगेकर, तानाजी पवार, प्रा. परशुराम येसलवाड, रवि बंडेवार, गंगाधर करेवार, गंगाधर कदम, अविनाश चिद्रावार, गंगाधर ढवळे, अनिल गवंगावकर, अनिरुद्ध सिरसाळकर, पुरुषोत्तम मोतेवार, रविराज जाधव, रामराम वाकोरे, सचिन गायकवाड, राजेश पवार, प्रकाश कांबळे यांच्यासह शिक्षक सेनेचे पदाधिकारी व प्रलंबित प्रश्नांशी संबंधित शिक्षक उपस्थित होते.

## 'न समजलेले आई-वडील' विषयावर कुंडलवाडीत आज डॉ. वसंत हंकारे यांचे व्याख्यान

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शहरातील श्री महालक्ष्मी मंदिर येथे 'न समजलेले आई-वडील' या विषयावर भावस्पर्शी व जीवनाला दिशा देणारे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. प्रसिद्ध व्याख्याते डॉ. वसंत हंकारे हे या व्याख्यानातून मार्गदर्शन करणार आहेत.

गुरुवार, दि. १३ ऑगस्ट रोजी रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत श्री महालक्ष्मी मंदिर, कुंडलवाडी येथे हा व्याख्यान सोहळा होणार आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आई-वडील आणि मुलां-मधील नाते कसे जपावे, मुलांशी संवाद साधताना पालकांनी कोणती काळजी घ्यावी, आधुनिक युगात मुलांवर योग्य संस्कार कसे करावेत, तसेच मुलांच्या मनातील भावना समजून घेत त्यांच्याशी प्रेम, विश्वास आणि संवादातून कौटुंबिक नाते अधिक घट्ट कसे करावे, याबाबत डॉ. हंकारे मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानाचा लाभ कुंडलवाडी शहर व परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाचन संस्कृतीमुळेच युवकांची जडणघडण सक्षम होते -सुजात आंबेडकर



**नांदेड (प्रतिनिधी)–** नवी पिढी विविध क्षेत्रांत सक्षमपणे पुढे जात असली तरी तिच्या सर्वांगीण विकासासाठी वाचनाची सवय जोपासणे अत्यंत आवश्यक आहे. ज्ञान, विचार आणि सामाजिक जाण समृद्ध करण्यासाठी पुस्तकांचे वाचन महत्त्वाची भूमिका बजावते, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू सुजातदादा आंबेडकर यांनी केले.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हा परिषद परिसरात क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव-२०२६ निमित्त आयोजित भीमगीतांच्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, मयूर आंदेलवाड, अमित राठोड, समाजकल्याण अधिकारी राजू एडके, नगरसेवक प्रशांत इंगोले, रणजीत गजभारे, राजेश जोंधळे, धनंजय गुम्मलवार, विजय वाघमारे तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. उच्च शिक्षणासोबतच सातत्यपूर्ण वाचनाची सवय प्रत्येकाने जोपासली पाहिजे.

कार्यक्रमात महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका मीरा भालेराव (मुंबई) तसेच रोहित उन्हवणे, प्रदीप डोणे आणि विवेक जगताप यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करणारी बहारदार भीमगीते सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### महापुरुषांचा वारसा पुढे नेणे आवश्यक -सीईओ महेश पाटील

समाजसुधारणेसाठी संत, समाजसुधारक आणि महापुरुषांनी केलेले कार्य आजही दिशादर्शक आहे. समाजाच्या गरजा ओळखून त्यांनी दूरदृष्टीने कार्य केले. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्या कार्यातून योगदान देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी केले. प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही आपली सेवा बजावताना महापुरुषांचे विचार आचरणात आणून त्याच भावनेतून काम करावे. समाजहिताला केंद्रस्थानी ठेवून प्रामाणिकपणे कार्य केल्यास महापुरुषांच्या विचारांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

# नांदेड पतंजलीतर्फे स्नेहांकित कॉलनी बालाजी मंदिर देवस्थान येथे पाच दिवसीय योग शिबिर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय योग परंपरेचा प्रसार आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजात रुजविण्याच्या उद्देशाने पतंजली योगपीठ परिवार नांदेड यांच्या परिश्रमाने बालाजी मंदिर स्नेहांकित कॉलनी मालेगाव रोड नांदेड ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय योग शिबिरास उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात शहर परिसरातील विविध वयोगटातील नागरिक, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. दररोज अनिल अमृतवार, राम शिवोपनर, अवधूतजी गिरी महाराज पुयणीकर, स्नेहाताई मोहोकार, हनुमंत ढगे, ईश्वर दासे जवळेकर अशा वेगवेगळ्या योग शिक्षकांनी योगासने, प्राणायाम, ध्यान आणि आरोग्य विषयक मार्गदर्शन करून सहभागींचे आरोग्याविषयी जनजागरण केले.

यावेळी आयोजकांनी योगामुळे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुधारण्यास मोठी मदत होते, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा, असे आवाहन केले. उपस्थितांनीही शिबिराचे कौतुक करत भविष्यात अशा उपक्रमांचे नियमित योग शिबिरे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली. या पाच दिवसीय योग शिबिरामुळे परिसरात योगाबाबत जनजागृती निर्माण झाली असून निरोगी आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. यास प्रसंगी ईश्वर दासे, हरिहर नरवाडे, हरिहर मोहकार, प्रभाकर काळे, गोविंद गंजेवार, सुभाष पाटील, कविता केंद्रे, वर्षा नागोरे, वंदना खवास, दीक्षा वाघमारे, क्षमा वाघमारे, सपना बंडे, गीता महाराज, सरिता दुमान, उर्मिला काळे, स्नेहा मोहोकार, शिवाजी शिंदे हळदेकर, सदाशिव बुटले पाटील, भरत मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अखेर लोहा येथील जायकवाडी परिसरातील धम्मध्वज प्रकरणी लोहा पोलिसांत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**लोहा (प्रतिनिधी)–** शहरातील कंधार रोडस्थित जायकवाडी वसाहत परिसरात असलेला धम्मध्वज काढल्यानंतर ऑगस्ट महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात तरुण भीमसैनिकांनी पंचशील धम्मध्वज पुनर्स्थापित केला. त्यानंतर चार दिवसानंतर पाच आंदोलकांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले.

कंधार रोडस्थित जायकवाडी वसाहत परिसरात मागील तीस ते पस्तीस वर्षांपासून बौद्ध समाजाचा पंचशील धम्मध्वज होता. मात्र मे महिन्यात सदरील ध्वज काही मंडळींनी काढून टाकला होता. त्यामुळे सकल बौद्ध समाज बांधवांतून सदरील घटनेप्रकरणी तीव्र संताप व्यक्त होत होता. त्या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी तहसील कार्यालयावर जून महिन्यात प्रचंड मोर्चा देखील काढण्यात आला होता. परंतु प्रशासनाकडून कुठलीच कार्यवाही होत नसल्यामुळे दि. ८ ऑगस्ट रोजी पहाटे काहीं आंबेडकरी तरुण भीमसैनिकांनी परत त्याच जागेवर पंचशील धम्मध्वज पुनर्स्थापित केला. त्यानंतर सदर जायकवाडी वसाहत जागेवर आंबेडकरी घराण्याचे वंशज रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, युवा नेते ॲड. अमन आंबेडकर, वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर, राहुल प्रधान, राजेश्वर हत्तीअंबिरे, मधव जमदाडे, मनपाचे नगरसेवक प्रशांत इंगोले, राहुल सोनसळे यांच्यासह जिल्ह्यातील असंख्य प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावून पंचशील धम्म ध्वजास अभिवादन केले. त्यानंतर दि. ११ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा माजी नगरसेवक पंचशील कांबळे, ज्येष्ठ नेते गंगाधर महाबळे, छगन हटकर, सचिन नवघडे, नामदेव बुद्धे व इतरांवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत १८९(२), १८९(३), १९०, १२६(२), ३२९(३), २२३ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास लोहा पोलीस करीत आहेत.

### टी.सी. हरवली

माझी सुनीता शिवाजी मोरे या नावाची इयत्ता बारावी पासची टीसी व मार्कमेमो भोकर ते नांदेड बस प्रवासात गहाळ झाली असून कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा.

:: संपर्क ::
सुनिता शिवाजी मोरे
रा. पवार कॉलोनी भोकर
ता.भोकर जि. नांदेड
मो.७०८३६९७५८५

### टी.सी. हरवली

माझी श्रावण दत्ता शिंदे या नावाची चौथी पास टी.सी व महत्त्वाचे शैक्षणिक कागदपत्रे शिराढोण ते नांदेड बस प्रवासादरम्यान हरवले आहे. कोणास हा दाखला सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

::संपर्क ::
श्रावण दत्ता शिंदे
रा. दाताळा
मोबाईल नं. ९८६०१७१९१५

### टी.सी. हरवली

माझी हाजरा फातेमा मोहम्मद आतिख या नावाची ३ पासची टी.सी. कंधार ते नांदेड बस प्रवासात हरली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

:: संपर्क ::
हाजरा फातेमा मोहम्मद आतिख
कंधार ता.जि. नांदेड

### जाहिर प्रगटन

**मा. जिल्हा न्यायाधीश २ नांदेड यांच्या न्यायालयात ता.जि. नांदेड**

Civil M.. No. 115/2026

Pooja Jondhale Vs. Nil

अर्जदार - १. पुजा भ्र. रविंद्र जोंधळे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, २. लोभांशु पि. रविंद्र जोंधळे, वय ९ वर्षे, धंदा शिक्षण, मार्फत अ.पा.क. जन्मदात्री आई अर्जदार क्र. १ पुजा भ्र. रविंद्र जोंधळे, मो. नं. ९०९६१८२७५९, ३.प्रयागबाई भ्र. लोभाजी जोंधळे, वय ८० वर्षे, धंदा पेन्शनर, वरील सर्व रा. पंचशिल नगर, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी, ४. गौतम पि. लोभाजी जोंधळे, वय - ६८ वर्षे, धंदा - पेन्शनर, रा. छत्रपती चौक जवळ, गंगा कॉलनी, वाडी बु. ता. जि. नांदेड

गैरअर्जदार -निरंक

दावाः-कलम ८ पालकत्व कायदा १९५६ नुसार अज्ञान बालकाच्या नावे असलेली जमीन विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

महोदय,

ज्याअर्थी, पुजा भ्र. रविंद्र जोंधळे यांचा मुलगा नावे लोभांशु पि. रविंद्र जोंधळे याच्या नावे मौजे सावंगी बु. ता. जि. नांदेड येथील गट नं. ९० मधील प्लॉट नं. १३९ च्या निम्या प्लॉटच्या क्षेत्रफळापैकी २९१.६ चौरस फुट असलेला प्लॉट वरील अर्जदार १ ते ४ यांच्या नावे असुन अर्जदार क्र. २ हा अज्ञान आहे.

उक्त जमीन अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या शिक्षणाकरिता व त्याच्या भविष्याच्या सर्वांगिण विकासासाठी अर्जदार क्र. ४ यांना विक्री करण्याचे ठरविले आहे.

उक्त व्यवहाराबाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा आक्षेप मा. जिल्हा न्यायाधीश-२, नांदेड यांच्या न्यायालयात दि. १९-०९-२०२६ पर्यंत दाखल करावा अन्यथा नंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. आणि सदरील अर्जाचा योग्य तो विचार करून अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
सहा. अधिक्षक
जिल्हा न्यायालय, नांदेड

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

### जाहीर समन्स

**नांदेड येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड यांच्या न्यायालयात,**

वादी :- जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था म. किनवट ता. किनवट, जि. नांदेड मार्फत अधिकृत कर्मचारी

**विरूद्ध**

**प्रतिवादी :-** मिर्झा इम्तियाज बेग मिर्झा बहादूर बेग, रा. रॉयल प्रोव्हीजन ॲन्ड बेकरी, सेंट्रल बसस्टँड रो. किनवट, ता. किनवट, जि. नांदेड

| अ.क्र. | सहकार केस नं. | प्रतीवादीचे नाव व पत्ता | दावा रक्कम रूपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | सी.सी.एन/१४३/२०२४ | ३. समाधान गोपीनाथ कांबळे यांचे वारसांस ३ ए श्रीमती प्रणिता समाधान कांबळे, रा. पिंपळगाव महादेव, रा. पिंपळगाव, ता. अर्धापूर जि. नांदेड | रू. ३, २४, ३०३/- | दि. ०७/०९/२०२६ |

ज्याअर्थी, वादी यांनी आपले विरूध्द या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर समन्स / नोटीसव्दारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तीशः अथवा योग्यरितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. ०७/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या विरूध्द करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे. उपरोक्त उल्लेखित तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स हे मा. न्यायाधीश यांच्या दिनांक. ०७/०८/२०२६ रोजीच्या हुकूमान्वये दिले आहे.

स्वाक्षरीत/-
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, नांदेड.

### MAHAVITARAN — E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**Invitation for Bids, E-Tender Notice T-14**

The Superintending Engineer (O&M Circle, Nanded) on behalf of MSEDCL (Employer) invites the bids from reputed agencies for E-Tender **"Work of Preventive Maintenance of sub-stations under O&M Circle Nanded"**

**SE/NDC/TS/HT/T-14/2026-27/ of Rs. 80 Lakhs**

The Tenders will be processed only in Electronic Tendering mode and open for registered contractors on e-Tendering system for work contracts of MSEDCL. Tender documents can be downloaded from employer's website https://etender.mahadiscom.in/eatApp/ up to **Dt.20.08.2026** after payment of E-tender fees online. For more details, please contact Ex. Engineer (Adm), Nanded Circle. **Mob. No: 7558376333**

This office reserves all the right to reject any or all the offers without assigning any reason thereof.

**PRO No.48/2026-27**
**dt.11.08.26**

**Superintending Engineer**
MSEDCL, Circle Office Nanded.

### जाहीर प्रगटन

**मा. जिल्हा न्यायाधीश-२, कंधार यांच्या न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज कमांक २९/२०२६**
**ज्ञानेश्वर विरूष्द निरंक**

ज्याअर्थी अर्जदार ज्ञानेश्वर पि. अशोक शिंदे, वय-१७ वर्षे, व्यवसाय शिक्षण अ.पा.क. आई संगिता भ्र. अशोक शिंदे, राहणार लाडका, ता. कंभार जि. नादेड यांनी या न्यायालयात हिंदु अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा कलम ८ अंतर्गत व पालक आणि वार्ड कायदा कलम २८ अंतर्गत त्याचा अल्पवयीन मुलगा १. ज्ञानेश्वर पि. अशोक शिंदे यांच्या मालकीच्या मौजे लाडका ता. कंधार जि. नांदेड येथील गट/सर्व्हे कमांक १५० मधील क्षेत्रफळ ० हेक्टर ७५ आर. ही जमीन/मालमत्तेची विकी आणि विल्हेवाट लावणेबाबत या न्यायालयात परवानगी मिळणेबाबतचा अर्ज दाखल केला आहे.

सदरील मालमत्तेबाबत कोणाचा व कसलाही उजर अथवा आक्षेप असल्यास दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त दिवशी म्हणजेच दिनांक ०७/०९/२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक ०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरीत/-
(के.एम. होणराव)
कनिष्ठ लिपीक

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
अधीक्षक
जिल्हा न्यायालय

### Change In Name

My Old Name is **Girish Balasaheb Lakkhekar Patil** which now I am Changing as New Name **Girish Balasaheb Lakhekar Patil** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - 1-18-295, Purna Road, Opp. Ashirwad Garden, Dnyaneshwar Nagar, Nanded Maharashtra 431605**

### Change In Name

My Old Name is **Devakate Ramrao Shesherao** which now I am Changing as New Name **Ramrao Sheshrao Devkate** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - C/o. Sheshrao Devkate Ward No. 1, Mankadevi, Ukhali Parbhani Maharashtra 431514**

### Change In Name

My Old Name is **Mangesh Vithalrao Patil** which now I am Changing as New Name **Mangesh Vitthalrao Patil** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - C/o. Mangesh Vitthalrao Patil At. Kherda Kurd Po. Dongar Shelki, Udgir, Latur Maharashtra 413518**

पान ३ वरून...

| | | |
|---|---|---|
| | | v) The certificate of licensed personal stating that the proposal is strictly in accordance with the provisions of UDCPR.<br><br>No more details shall be necessary. |
| 9 . | Issue of Commencement Certificate/ Approval. | The receipt of application along with the required documents and fees / charges mentioned in 8 above, by the authority shall be treated as permission for development. |
| 10 | Plinth Checking | Plinth Checking shall not be required. |
| 11 | Occupation Certificate | After completion of the work, the owner shall intimate to the Authority about the occupation of the building. |

**Note : -**

1) The above procedure for permission shall not bar the owner to obtain development permission as per provisions of this UDCPR, if he so desires
2) Notwithstanding anything mentioned above, if number of rooms exceeds 8 in Agro Tourism Centre, it shall be considered as commercial enterprises and for such proposal it shall be necessary to obtain development permission as per sanction Unified Development Control and Promotion Regulations from concerned Authorities.
3) All other provisions and terms / conditions mentioned in Government Resolution of Department of Tourism and Cultural Affairs No.TDS-2018/8/CR.514/Tourism, dated 28.09.2020 shall be applicable.
4) These directives shall come into force with immediate effect.
5) Notwithstanding anything contained in these regulations, the changes mentioned in these regulations for allied activities shall be subject to amendment made by the Government time to time as per the Agro Tourism Policy-2016 & Government resolution No. TDS-2019/8/C.R. No.514/ Tourism, dated 28/09/2020. as per the Agro Tourism Policy-2020
6) For the Agro Tourism Centre and allied activities minimum road width shall be 9.0 m.

*By order and in the name of the Governor of Maharashtra.*

**(Pranav Karpe)**
**Deputy Secretary to Government**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# पीक नोंदणीसाठी सहायकांना सहकार्य करा- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## ई-पीक पाहणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची नाळेश्वर व लिंबगाव मंडळातील शिवाराला भेट

**नांदेड (प्रतिनिधी)** –ई-पीक पाहणी हा शासनाचा महत्त्वपूर्ण व प्राधान्यक्रमाचा प्रकल्प असून त्याची १०० टक्के प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा त्रास कमी करून सातबारावरील पिकांची ऑनलाईन नोंद अचूकपणे होण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक नोंदणीसाठी नियुक्त सहायकांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

खरीप हंगाम २०२६-२७ पासून डिजिटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी करण्यात येत आहे. ११ ऑगस्ट ते १० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ही कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. गट व सर्वे क्रमांकनिहाय प्रत्यक्ष पिकांची माहिती डिजिटल स्वरूपात संकलित करून पीक नोंदणी अद्ययावत करण्यात येत आहे. या माहितीचा उपयोग



विविध कृषी योजना, पीकविमा, आपत्ती मदत, कृषी सांख्यिकी तसेच ग्रीस्टॅकसाठी करण्यात येणार आहे. ई-पीक नोंदणीचे महत्त्व व आवश्यकतेबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बुधवारी नाळेश्वर मंडळातील सोमेश्वर आणि लिंबगाव मंडळातील वरखेड शिवाराला भेट दिली. यावेळी त्यांनी स्वतः मोबाईल ॲपद्वारे पीक नोंदणी करून शेतकऱ्यांना या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ६३९ सहायकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका, महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाचे कर्मचारी, सीएससी चालक तसेच ग्रामस्तरावर मानधन तत्त्वावर कार्यरत अन्य विभागांच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

यावेळी तहसीलदार विपीन पाटील, मंडळ अधिकारी शिवानंद स्वामी, मधुकर फुलवळे, ग्राम महसूल अधिकारी गजानन वळगे, महेश जोशी, मारोती कदम यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

**क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना**

ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी त्यांच्या लॉगिनमधून गावांचे काम वाटप अर्थात टास्क अलोकेशन तातडीने पूर्ण करावे. टास्क अलोकेशन करताना गावाच्या नकाशानुसार प्रत्यक्ष पाहणी करून सहायकास सोयीचे होईल, याची खात्री करूनच गटांचे वाटप करावे, असे कळविले आहे.

# नांदेड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली रात्रभर 'कोम्बिंग ऑपरेशन'

## सराईत गुन्हेगारांवर कडक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्ध व शरीराविरुद्ध होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांना आळा घालणे, कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करणे आणि सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर कडक नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने पोलीस दलातर्फे संपूर्ण जिल्ह्यात विशेष 'कोम्बिंग' ऑपरेशन राबवण्यात आले.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या थेट आदेशानुसार ११ ऑगस्ट २०२६ रोजीच्या रात्री ११ वाजेपासून ते १२ ऑगस्ट २०२६ च्या पहाटे ३ वाजेपर्यंत हे धडक तपासणी अभियान राबवण्यात आले. या विशेष मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, तडीपार व हद्दपार इसम, हिस्टीशिटर, वॉन्टेड आणि फरार आरोपींची सखोल पडताळणी करण्यात आली. तसेच न्यायालयातून जारी करण्यात आलेले वॉरंट बजावणे व संशयित व्यक्तींची झडती घेणे अशी व्यापक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत ५५ पोलीस अधिकारी व २१८ अमलबजावणी कर्मचारी, स्थानिक गुन्हे शाखा आणि आरसीपी पथकातील जवानांनी सक्रीय सहभाग घेतला.



तपासणीदरम्यान कलम ५५, ५६, ५७ अन्वये प्रस्तावित असलेल्या ३० तडीपार आरोपींची आणि एमपीडीए कायद्यांतर्गत सुटलेल्या ३३ गुन्हेगारांची झाडाझडती घेण्यात आली. याशिवाय मालमत्ता व शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांतील ८८ सराईत गुन्हेगारांची कसून तपासणी करण्यात आली. अवैध शस्त्र बाळगल्याप्रकरणी आर्म ॲक्टनुसार वजिराबाद, भाग्यनगर, इतवारा आणि विमानतळ पोलीस ठाण्यात प्रत्येकी एक याप्रमाणे ४ गुन्हे नोंदवून ४ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच कलम १२२ म.पो.का. अन्वये वजिराबाद आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात २ गुन्हे दाखल करून ३ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत पोलिसांनी २९ जामीनपात्र वॉरंट, ५ बिगरजामीनपात्र वॉरंट आणि ५५ समन्सची यशस्वी बजावणी केली. अपर पोलीस अधीक्षक (नांदेड व भोकर), सर्व उपविभागीय अधिकारी आणि जनसंपर्क अधिकारी आशिष सीताराम बोराटे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली. जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीवर वचक बसवण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष कारवाया यापुढेही सातत्याने राबवल्या जातील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.



**नांदेड**– पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री तथा शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंघ बादल हे नांदेड विमानतळावर आले असता त्यांचे गुरूद्वारा बोर्डाचे माजी सचिव रवींद्रसिंघ बुंगई यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. **(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# धनेगाव पेट्रोल पंपावरील खूनप्रकरणी फरार सहावा आरोपी अटकेत

## गोवर्धनघाट परिसरातून स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**–धनेगाव येथील पेट्रोल पंपावर झालेल्या खूनप्रकरणातील फरार सहाव्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोवर्धनघाट परिसरातून अटक केली. अजय ऊर्फ अज्जू महेंद्र बिगानिया (वय ३२, रा. वाल्मिकी नगर, देगलूर नाका, नांदेड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांतील फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी इंदरजितसिंघ पि. बलजितसिंघ बावरी (वय २५, रा. संत गाडगेबाबा सोसायटी, जुना कौठा, नांदेड) हे मोटारसायकलमध्ये पेट्रोल भरण्यासाठी धनेगाव येथील धनेगावकर पेट्रोल पंपावर गेले होते. यावेळी यांच्यावर खंजराने वार करून त्यांचा खून करण्यात आला. फरार आरोपींच्या शोधासाठी दि. ११ ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांच्या पथकाने विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू केली होती. वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोवर्धनघाट परिसरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय बातमीदाराकडून अजय ऊर्फ अज्जू बिगानिया हा परिसरात लपून बसल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन तपास व कायदेशीर कारवाईसाठी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणात यापूर्वी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाच आरोपींना ताब्यात घेतले असून, आता सहाव्या आरोपीलाही अटक करण्यात आली आहे. आरोपींची घटनाक्रमातील भूमिका, हल्ल्याचे नियोजन, परस्पर संबंध, इतर सहभागी व्यक्ती तसेच हल्ल्यात वापरण्यात आलेले शस्त्र याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड तसेच पोलीस अंमलदार संदीप घोगरे, बालाजी कदम, इम्रान शेख, संतोष बेल्लुरोड, प्रमोद जोंधळे, रवी हराळे व अमोल घेवारे यांनी केली.

# स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान कलम १६३ लागू

## नांदेडमध्ये स्वातंत्र्य दिनासाठी प्रतिबंधात्मक आदेश; आंदोलन, मोर्चे, धरणे करण्यास मनाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि सार्वजनिक शांतता व सुरक्षितता कायम राहावी, यासाठी नांदेड पोलिसांनी कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालयाचे पत्र क्र. ५०८९/२०२६, दि. ११ नुसार पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता- २०२३ चे कलम १६३ अन्वये नांदेड शहरातील काही महत्त्वाच्या ठिकाणांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले आहेत.

सदर आदेश दि. १३ रोजी सकाळी ९ वाजेपासून ते दि. १५ ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा गांधी पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड, तहसील कार्यालय नांदेड, पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय, शासकीय वैद्यकीय रुग्णालय, वजिराबाद, नांदेड या ठिकाणांकडे जाणारे प्रमुख मार्ग व परिसरात विशेष खबरदारी घेण्यात येणार आहे.

या कालावधीत वरील ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कोणतेही आंदोलनात्मक कार्यक्रम करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्यामध्ये उपोषण, आत्मदहन, धरणे, मोर्चे, रॅली, सभा तसेच इतर आंदोलनात्मक कार्यक्रम आयोजित करून गर्दी करणे किंवा सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करणे समाविष्ट आहे.

स्वातंत्र्य दिन हा राष्ट्रीय सण असल्याने या कालावधीत नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जिल्हा पोलीस प्रशासनाकडून स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही संशयास्पद बाब निदर्शनास आल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रॅगिंग प्रतिबंधक कायद्याबाबत विद्यापीठात कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रह्मे यांच्या मार्गदर्शनानुसार बुधवारी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा, १९९९ च्या अनुषंगाने कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर तसेच प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे लोक अभिरक्षक शकील, मुधोळकर आणि दादासाहेब वैद्य यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक कायदा, त्यातील तरतुदी तसेच रॅगिंगविरोधी उपाययोजनांबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

# मनपाच्या वतीने नांदेडमध्ये आज तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत हडको ते नांदेड तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन १३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा-निमित्त हर घर तिरंगा मोहिमेंतर्गत देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता तसेच भारतीय राष्ट्रध्वजाविषयी आदर, अभिमान आणि जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने भव्य तिरंगा बाईक रॅली आयोजित



करण्यात आली आहे. सदरील रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, हडको, नांदेड ते तिरंगा ध्वज (शहीद जवान स्मारक) शासकीय तंत्रनिकेतनमहाविद्यालय चौक, व्ही. आय. पी. रोड, नांदेड जाणार आहे. या रॅलीत महापौर कविता मुळे, डॉ. आयुक्त महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे, शिक्षण, महिला व बालकल्याण समिती सभापती निरंजना लांडगे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व निलेश सुंकेवार, गटनेता इंजि. प्रशांत इंगोले व सय्यद मुजीब स. मुख्तार, साबेर चाऊस यांच्यासह मनपाचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या रॅलीत प्रभाग क्रमांक १९ च्या नगरसेविका सौ. अनुराधा राजू पाटील काळे, श्रीमती सुलोचना धोंडिबाराव काकडे, सौ. दीपाली मोरे, अभिषेक सौदे, प्रभाग क्रमांक २० चे नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सौ. सुर्वणा सतीश बसवदे, मंगला गजानन देशमुख, निरंजना राजू लांडगे यांच्यासह परिसरातील लोकप्रतिनिधी सहभागी होणार असून, या रॅलीत शहरातील व परिसरातील नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उपाम यांच्याकडून लातूरमध्ये लोकाभिमुख उपक्रम

## सायबर फसवणुकीपासून ते अनेक वादांची दखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –नागरिकांच्या तक्रारी समजून घेऊन जलद निपटारा करणे आणि पोलीस-नागरिकांमधील संवाद वाढवून लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्वास दृढ करणे, या उद्देशाने नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांमध्ये 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक हे प्रत्येक महिन्याला जिल्हा मुख्यालयांना भेटी देतात. यावेळी त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या तत्परतेने सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. दि. १२ ऑगस्ट रोजी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात जिल्हा पोलिसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतला. त्यानंतर दुपारी



३:३० ते ६:३० या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी त्यांनी थेट 'संवाद' साधला.

यावेळी एकूण ४५ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पो. उपमहानिरीक्षक यांना सादर केले. यामध्ये मालमत्ताविषयक वाद, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांच्या तपासाबाबत, अवैध व्यवसाय आदी प्रकारच्या तक्रारींचा समावेश होता. प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन त्यांच्या जलद निपटाऱ्यासाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. तक्रारींच्या जलद सोडवणुकीसाठी पो. उपमहानिरीक्षक कार्यालयाने 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली यापूर्वीच सुरू केली आहे. 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची नोंद 'संवेदना' पोर्टलवर करून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार आहेत.

या कार्यक्रमाप्रसंगी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा व शहरातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

# कागदावर गोदावरी स्वच्छ; नदीतील पाण्याच्या गुणवत्तेची चिंता कायम?

**नांदेड प्रतिनिधी)**– गोदावरी नदी प्रदूषणमुक्त झाल्याचा दावा करण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेने राष्ट्रीय हरित लवादासमोर विविध उपाययोजनांची माहिती सादर केली आहे. मात्र, कागदावर मांडलेल्या कामांपेक्षा नदीच्या पाण्याची प्रत्यक्ष गुणवत्ता महत्त्वाची असल्याचे सांगत पर्यावरणवादी नागरिकांनी महापालिकेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

महापालिकेच्या उत्तर - शपथपत्रानुसार शहरातील ९५ टक्के क्षेत्र सांडपाणी वाहिनीच्या जाळ्याने जोडले असून, ९४२ किलोमीटर लांबीचे जाळे अस्तित्वात आहे. सात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यरत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. गोदावरीत जाणारे नाल्यांचे पाणी रोखण्यासाठी अमृत २.० योजनेंतर्गत ३.३ किलोमीटर लांबीची पाईपलाईन आणि १७ इंटरसेप्टर संरचना उभारण्यात आल्याचा दावा आहे. बोंढार येथील प्रक्रिया प्रकल्पाकडे नाल्यांचे पाणी वळविण्यात येत असून, चुन्नी नाल्यातील दहा एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. बंदाघाट येथे तीन एमएलडी क्षमतेचा पॉकेट एसटीपी उभारण्यात आला असून, दक्षिण भागातील सहा नाल्यांचे पाणीही प्रक्रिया प्रकल्पाकडे वळविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र, या सर्व उपाययोजना नेमक्या कोणत्या कालावधीत करण्यात आल्या, त्यापूर्वी नदीत किती सांडपाणी जात होते आणि आता किती प्रमाणात घट झाली, याची तुलनात्मक माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही, अशी टीका पर्यावरणवादी नागरिक करत आहेत. याचिकाकर्त्या जयमाला ढाणकीकर यांच्या पुढाकारामुळे हा प्रश्न राष्ट्रीय हरित लवादासमोर पोहोचला आणि त्यानंतर प्रशासनाने हालचाली वाढवल्याचा आरोपही करण्यात येत आहे. नगिनाघाट येथे मासे मृत्यूच्या घटनेबाबत महापालिकेने तात्पुरत्या बंधाऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह थांबून ऑक्सिजन कमी झाल्याचे कारण दिले आहे. मात्र, नदी प्रदूषणाचा अंतिम निर्णय केवळ प्रशासनाच्या दाव्यांवर नव्हे, तर वैज्ञानिक तपासणीवर होणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तपासणीत गोदावरीच्या प्रदूषणाची पातळी नेमकी किती आहे, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे आगामी अहवाल आणि राष्ट्रीय हरित लवादातील सुनावणी महापालिकेच्या 'गोदावरी प्रदूषणमुक्ती'च्या दाव्याची खरी परीक्षा घेणार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com